१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार ३ जुलै, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१२०, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 120 Marathi - Daily - Mumbai, 3 July, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!


मुंबईत पुन्हा अपघात! सर्वसामान्य जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची?

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

## ६ फुटांहून मोठ्या पीओपी गणेशमूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्त्रोतांत करू द्या

### राज्य सरकारची हायकोर्टात मागणी



**गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही सहा फुटांपेक्षा मोठ्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेश मूर्तींचे नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करण्यास दिलेली परवानगी कायम ठेवावी, अशी मागणी राज्य सरकारच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाकडे करण्यात आली आहे.**

■ मुंबई

**या संदर्भात** ठाणे येथील पर्यावरणवादी कार्यकर्ते रोहित जोशी आणि पारंपरिक शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तीकारांनी उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल केली आहे. पीओपी गणेश मूर्तींची निर्मिती आणि त्यांचे नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करण्यास याचिकेद्वारे विरोध करण्यात आला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) २०२० मध्ये या संदर्भात जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी, अशी याचिकाकर्त्यांची मागणी आहे. सीपीसीबीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पीओपीच्या गणेश मूर्ती तयार करणे आणि त्यांचे नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करण्यास मनाई आहे.

दुसरीकडे सीपीसीबीच्या मार्गदर्शक तत्वांना » पान २ वर

# मुंबईच्या मॅनहोलमध्ये पडून पुन्हा एक मृत्यू

# नेत्यांचा फक्त एकमेकांवर आरोपांचा तमाशा

**मुंबईत पावसाळा सुरू होताच चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळून एका निष्पाप विद्यार्थ्याच्या मृत्यूच्या घटनेने मुंबईकरांना हादरवले होते. या घटनेच्या अवघ्या दोन दिवसांनी मुंबई महापालिकेच्या बेजबाबदार कारभारामुळे आणखी एका मुंबईकराचा बळी गेला आहे. साकीनाका येथील खैराणी रोड परिसरात उघड्या ठेवलेल्या मॅनहोलमध्ये पडून अस्लम इसाक शेख यांचा मृत्यू झाला. संतापजनक गोष्ट अशी की, या दुर्घटनेनंतर नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारण्याऐवजी राजकीय नेते आपली जबाबदारी झटकून एकमेकांवर आरोप करण्यामध्येच गुंतल्याचे दिसले. ९ वर्षांपूर्वी मुंबईत उघड्या मॅनहोलमध्ये पडून प्रसिद्ध डॉक्टर दीपक अमरापूरकर यांचा मृत्यू झाला होता. यानंतर मॅनहोलना जाळी बसवण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र इतक्या वर्षांनंतरही त्या न बसवण्यात आल्याने आज आणखी एका मुंबईकराचा बळी गेला, हे दुर्दैवी वास्तव आजच्या घटनेने ठळकपणे उघडकीस आणले. पालिका उपायुक्त अश्विनी भिडे यांनी मात्र दावा केला की, मुंबईतील सर्व मॅनहोलवर जाळ्या बसविल्या आहेत. मात्र एकदोन ठिकाणी हे काम सुरू होते. जिथे अपघात झाला तिथे जबाबदारी निश्चित करून कारवाई केली जाईल.**



अस्लम इसाक शेख



■ मुंबई

**मुंबईत** आज सकाळपासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक भागांत पाणी साचले होते. साकीनाका येथील खैराणी रोडवरील सन्मान हॉटेलसमोरील मॅनहोल उघडे ठेवण्यात आले होते. घटनास्थळी कोणतेही बॅरिकेड, इशारा फलक किंवा सुरक्षेची व्यवस्था नव्हती. तिथे जाळी बसविण्याचे काम सुरू होते, त्यासाठी ते उघडे केले होते असा पालिकेचा दावा आहे. ५५ वर्षीय अस्लम शेख हे सकाळी कामावर निघाले होते. परंतु पावसामुळे पाणी साचल्याने त्यांनी घरी परतण्याचा निर्णय घेतला. ते इथून जात असताना मॅनहोलमध्ये २५ ते ३० फूट खोल कोसळले. त्यानंतर एकच खळबळ उडाली. अस्लम शेख मॅनहोलमध्ये पडताच जवळ उभ्या असलेल्या एका व्यक्तीने त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच्या हाती केवळ शेख यांची छत्री लागली आणि प्रचंड वेगाने वाहणाऱ्या पाण्यामुळे शेख नाल्यात ओढले गेले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर महापालिका कर्मचारी, पोलीस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. जवळपास चार तासांच्या शोधमोहिमेनंतर २०० मीटर अंतरावरील पुढील मॅनहोलमधून शेख यांना बाहेर काढण्यात आले. त्यावेळी ते बेशुद्धावस्थेत होते. मात्र, राजावाडी रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अधिकारी आणि नेते यांच्या बेजबाबदारपणामुळे एका नागरिकाचा जीव गेला. यानंतर एकमेकांवर आरोप करण्याचा राजकीय तमाशा सुरू झाला. उद्यापर्यंत हा तमाशा बंद होईल आणि कसलीही कारवाई न होता पुढेही असे धोके कायम राहतील.

या गंभीर घटनेनंतर मुंबई महानगरपालिकेच्या कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, हे मॅनहोल उघडे कसे राहिले? कुठल्या कंत्राटदाराने ते उघडे ठेवले? ऐन पावसाळ्यात मॅनहोलचे काम का हाती घेण्यात आले होते? त्याला कामाचे आदेश कुणी दिले होते? मॅनहोल उघडे असताना तिथे बॅरिकेड का लावले नव्हते? असे अनेक प्रश्न नेहमीप्रमाणे उपस्थित केले जात होते. मुंबईच्या महापौर भाजपाच्या रितू तावडे यांनी या दुर्घटनेला जबाबदार धरून पालिकेच्या एल विभागाचे सहाय्यक आयुक्त धनाजी हेर्लेकर, दुय्यम अभियंता दीपक चौघुले, कनिष्ठ » पान २ वर

## ऐरोली मनपा रुग्णालयात गर्भवतीचा मृत्यू
## मनपा आयुक्तांच्या दालनात आंदोलन

■ नवी मुंबई

**ऐरोली** येथील राजमाता जिजाऊ रुग्णालयात उपचारादरम्यान २३ वर्षीय गर्भवती सोनम डोंगरे आणि तिच्या पोटातील बाळाचा मृत्यू झाला. चुकीचे इंजेक्शन आणि निष्काळजी उपचारांमुळे हा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप कुटुंबियांनी केला. याच रुग्णालयात उपचार घेत असलेली दुसरी गर्भवती महिला रिचा मिश्रा हिची प्रकृती गंभीर असून, ती सध्या व्हेंटिलेटरवर आहे. याच रुग्णालयात चार महिन्यांपूर्वी गर्भवती प्रतीक्षा खांडेकर यांचाही चुकीच्या उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबियांनी केला आहे. याची संतप्त प्रतिक्रिया आज उमटली. या

**अधिष्ठाता निलंबित**

प्रकरणी मनसे आणि शरद पवार गटाने मनपा आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर रुग्णालयातील अधिष्ठाता भावना पगारेंचे निलंबन केले.

मृत सोनम डोंगरे हिचे पती करण डोंगरे यांनी सांगितले की, सोनमला प्रसूतीसाठी ऐरोली रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तिला चुकीचा डोस देण्यात आला, ज्यामुळे तिची प्रकृती अचानक खालावली. आम्ही विचारणा केली असता डॉक्टरांनी तीन तास तब्येत ठीक आहे, असे सांगत आम्हाला थांबवून ठेवले. नंतर परिस्थिती गंभीर झाल्यावर तिला वाशी येथील रुग्णालयात हलवण्यास सांगितले. मात्र तेथे पोहोचताच डॉक्टरांनी सोनम आणि बाळाला मृत घोषित केले. या निष्काळजीपणामुळे माझे कुटुंब » पान २ वर

## महिला कुस्तीपटू अत्याचार प्रकरणी
## आज ब्रजभूषण खटल्याचा निकाल

■ नवी दिल्ली

**महिला** कुस्तीपटू अत्याचार प्रकरणी भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष ब्रजभूषण शरण सिंह आणि भारतीय कुस्ती महासंघाचे माजी सचिव विनोद तोमर यांच्यावरील खटल्याचा निकाल उद्या शुक्रवारी दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालय देणार आहे. न्यायालयातील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अश्विनी पनवार यांनी आज दोन्ही बाजूंचे अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर हा निर्णय राखून ठेवला होता. सध्या ब्रजभूषण आणि तोमर हे जामिनावर आहेत.

तक्रारदार महिला कुस्तीपटूंच्या वतीने वरिष्ठ वकील रेबेका जॉन आणि आरोपी ब्रजभूषण सिंह यांच्या वतीने वकील राजीव मोहन यांनी अंतिम युक्तिवाद पूर्ण केला. न्यायालयाने ब्रिजभूषण यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ (विनयभंग), ३५४-ए (लैंगिक छळ)आणि ५०६ (गुन्हेगारी धमकी)अंतर्गत आरोप निश्चित केले आहेत. विनोद तोमर यांच्यावरही एका पीडितेला धमकावल्याप्रकरणी धमकीचा आरोप ठेवण्यात आला आहे.

## अयोध्या राम मंदिर दानचोरी प्रकरणी
## आरोपींच्या घरांवर बुलडोझर चालवणार

■ अयोध्या

**अयोध्या** राम मंदिर दानचोरी प्रकरणी आरोपींनी मंदिरात नोकरी लागल्यानंतर बांधलेल्या घरांची तपासणी सरकारने सुरू केली आहे. अयोध्या विकास प्राधिकरणाने नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आलेल्या घरांची ओळख पटवली असून, आरोपी लवकुश मिश्रा यांचे शहादतगंज येथील आणि अनुकल्प मिश्रा यांचे कौशलपुरी येथील घरांवर बुलडोझर कारवाई होण्याची शक्यता आहे. लवकुश मिश्रा यांच्या पत्नी सुप्रिया मिश्रा यांच्या नावावरील इमारतीलाही एडीएकडून नोटीस बजावण्यात आली आहे.

अयोध्या राम मंदिरातील दानपेटी चोरीप्रकरण अधिकच गंभीर बनले असून, तपासासोबतच ट्रस्टमधील



अंतर्गत वाद, वकिलांचे आंदोलन आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हस्तक्षेपामुळे या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. दानपेटी चोरी प्रकरणाचा सविस्तर अहवाल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्व उत्तर प्रदेशचे क्षेत्र प्रचारक अनिल कुमार यांनी तयार करून संघप्रमुख मोहन भागवत यांच्याकडे पाठविण्यात आला असून, ६ जुलै रोजी होणाऱ्या श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय होण्याची शक्यता आहे. आज अयोध्येत ५०० हून अधिक वकील रस्त्यावर उतरले. ट्रस्टचे माजी महासचिव चंपत राय, माजी विश्वस्त अनिल मिश्रा आणि माजी पदाधिकारी गोपाल राव यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी करत त्यांनी आंदोलन केले.

## क्रिकेटचा चेंडू सोबत ठेवून
## विहान श्रीवास्तववर अंत्यसंस्कार

■ मुंबई

**चेंबूर** येथे झाड कोसळून ११ वर्षीय विहान श्रीवास्तव याचा मृत्यू झाल्यानंतर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. परिसरात शोककळा पसरली. आई-

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



वडिलांचा एकुलता एक मुलगा असलेला विहान आनंदी स्वभावाचा असून त्याला क्रिकेटची विशेष आवड होती. त्याच्या आवडत्या क्रिकेट चेंडूसह त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आल्याचे कुटुंबियांनी सांगितले. दरम्यान, अपघातापूर्वी संबंधित झाडाबाबत वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे.

विहान याच्या कुटुंबियांनी आणि परिसरातील रहिवाशांनी या घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. विहानचे आजोबा एस. एन. श्रीवास्तव यांनी या घटनेमागे निष्काळजीपणा असल्याचा आरोप केला. झाड धोकादायक अवस्थेत असल्याबाबत रहिवाशांनी यापूर्वीही अनेकदा तक्रारी केल्या होत्या. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, असा दावा त्यांनी केला.

## बालभारतीच्या पुस्तकात गुजराती लोकनृत्य
## महाराष्ट्राची लोकनृत्ये धड्यातून वगळली

■ मुंबई

**बालभारतीच्या** इयत्ता सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'लोकनृत्य' या धड्यावरून वाद निर्माण झाला असून, महाराष्ट्राच्या समृद्ध लोकनृत्य परंपरेला योग्य स्थान न दिल्याची टीका होत आहे. नव्या शैक्षणिक आराखड्यानुसार तयार करण्यात आलेल्या या पुस्तकात राज्यातील लोकनृत्यांचा मर्यादित उल्लेख करण्यात आला आहे.

या धड्यात महाराष्ट्रातील केवळ 'दिंडी' नृत्याचा उल्लेख असून लावणी, लेझीम, धनगरी गजा, गोंधळ, कोळी नृत्य, पोवाडा यांसारखी राज्याची ओळख ठरलेली अनेक लोकनृत्ये व लोककला वगळण्यात



आल्याचे निदर्शनास आले आहे. याउलट गुजरात, पंजाब, छत्तीसगड आणि बिहारमधील लोकनृत्यांना सविस्तर माहिती व चित्रांसह स्थान देण्यात आल्याने नाराजी व्यक्त होत आहे. शिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना आपल्या राज्याच्या सांस्कृतिक वारशाची सखोल ओळख करून देणे आवश्यक असते. महाराष्ट्राची लोकनृत्य परंपरा ही केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून ती सामाजिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक अभिव्यक्तीचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. त्यामुळे अशा परंपरांकडे पाठ्यपुस्तकांमध्ये दुर्लक्ष होणे चिंताजनक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## ब्राँझचे दर वाढल्याने इंदू मिल
## स्मारक पुतळ्याचे काम रखडले

■ मुंबई


**भारतरत्न** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम ब्राँझच्या वाढत्या दरामुळे रखडले आहे. तसेच या कामाबाबत शापूरजी पालनजी कंपनीकडून अद्याप सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आलेला नसल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधानसभेत दिली. आमदार अशोकराव माने आणि संतोष दानवे यांनी स्मारकाचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.

संजय शिरसाट यांनी सांगितले की, इंदू मिल स्मारकाच्या बांधकामाचे कंत्राट मे. शापूरजी पालनजी कंपनीला एकरकमी पद्धतीने देण्यात आले आहे. तर स्मारकातील पुतळ्याच्या बाह्य कांस्य आवरणाचे काम नामवंत शिल्पकार राम सुतार फाईन आर्ट्स यांच्याकडे उपकंत्राटाद्वारे सोपविण्यात आले आहे. एप्रिल २०२६ मध्ये संबंधित कंत्राटदार आणि उपकंत्राटदारांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील परिस्थितीमुळे कांस्य धातू व त्यावरील प्रक्रिया खर्चात मोठी वाढ झाल्याचे निदर्शनास आणून दिले होते. शापूरजी पालनजी व राम सुतार यांच्यातील करारानुसार कांस्य धातूची किंमत प्रति किलो ८५० रुपये निश्चित करण्यात आली होती. पण सध्या कांस्य धातूचा दर प्रति किलो १,५०० ते १,७०० रुपयांपर्यंत पोहोचल्याची माहिती कंत्राटदाराने दिली आहे.

## कुंभमेळ्यासाठी ५६ हजार शौचालये
## आठ हजार सफाई कर्मचारी तैनात

■ नाशिक

**आगामी** सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक-



त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने स्वच्छतेसाठी विविध उपाययोजनांचा समावेश असलेला महाआराखडा तयार केला आहे. त्यानुसार कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून येणाऱ्या लाखो भाविकांसाठी ५६ हजार फिरती शौचालये उपलब्ध केली जाणार आहेत. तसेच तब्बल ८ हजार सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. कुंभमेळा पूर्णपणे प्लास्टिकमुक्त असावा याकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. साधूग्राम परिसर, नदी किनाऱ्यांवर घाट, वाहनतळ, भाविकांसाठीचे विश्रांती कक्ष या ठिकाणाला जोडणारे सर्व रस्ते आणि महामार्गांवर फिरती शौचालये उपलब्ध असणार आहेत. गर्दीच्या ठिकाणी ७ हजार कचराकुंड्या बसवण्यात येतील. कचरा कुंड्यांसाठी ९ लाख पिशव्या उपलब्ध करून दिल्या जातील.

## सियाच्या पॉलीग्राफ चाचणीसाठी
## पोलिसांचा न्यायालयात अर्ज

■ पुणे

**केतन** अग्रवाल हत्या प्रकरणी पोलीस आज मुख्य आरोपी सियाच्या घरी तिला घेऊन गेले. याशिवाय आणखी दोन ठिकाणीही सियाला नेऊन पोलिसांनी पंचनामा केला. तसेच सिया गोयल हिची पॉलीग्राफ म्हणजे लाय-डिटेक्टर चाचणी करण्यास परवानगी मिळावी, यासाठी पुणे पोलिसांनी न्यायालयात अर्ज केला आहे. केतनला नेमके कोणी दरीत ढकलले, याबाबत ठोस पुरावा उपलब्ध नसल्याने तपासाला पुढे नेण्यासाठी ही चाचणी आवश्यक असल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. आरोपी चेतन आणि सियाची पोलीस कोठडी उद्या संपणार आहे.

पोलिसांनी आज पुण्यातील कोंढवा भागात असलेल्या 'लीलाकुंज' या निवासस्थानी सियाच्या घरी पोलीस तिला घेऊन पोहोचले. घटनेच्या दिवशी सियाने परिधान केलेले कपडे जप्त करणे आणि त्या जप्तीची प्रक्रिया पंचनाम्याद्वारे नोंदवणे हा पोलिसांचा उद्देश होता. पोलीस सियाच्या घरी साधारणपणे एक तास थांबले. यावेळी सियाचे कुटुंबीयही उपस्थित होते.

## गोहत्या बंदीच्या आदेशाला
## तामिळनाडू सरकारचे आव्हान

**मुस्लीम बांधवांच्या बकरी ईद सणादिवशी तसेच अन्य कोणत्याही दिवशी राज्यात गाय किंवा वासराच्या कत्तलीवर बंदी घालण्याच्या मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. मद्रास उच्च न्यायालयाचे आदेश मूळ याचिकेच्या कक्षेबाहेरील असून तो प्राण्यांच्या कत्तलीबाबत आखून दिलेल्या वैधानिक चौकटीशी विसंगत आहे, असा युक्तिवाद तामिळनाडू सरकारने न्यायालयात केला आहे.**



■ नवी दिल्ली

**हिंदू** मक्कल कच्छी या हिंदुत्ववादी पक्षाचे सरचिटणीस के सूर्य पारसनाथ यांनी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. बकरी ईदच्या दिवशी कोईम्बतूर शहरात सार्वजनिक ठिकाणी गायींची कत्तल करण्यास मनाई करावी, अशी मागणी पारसनाथ यांनी केली होती. याचा अर्थ कोईम्बतूर शहर आणि बकरी ईदचा दिवस एवढ्यापुरता याचिकेचा आवाका होता. मात्र याचिकेवर २७ मे रोजी निकाल देताना मद्रास उच्च न्यायालयाने सरसकट गोहत्या बंदीचे आदेश दिले, असा आक्षेप घेत तामिळनाडू सरकारने उच्च न्यायालयाच्या त्या आदेशाला याचिकेद्वारे आव्हान दिले.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, पेशंटकेअर, (Male+ Female) पाहिजेत (राहणेखाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828** {NC261061}

लोअरपरेल/ चिंचपोकळी येथे गोडाऊनमध्ये कामासाठी. मुले (पगार १२ ते १४०००) पाहिजेत. संपर्कः **9320064643** किंवा **8080084843** वर Hi पाठवा. {NC261107}

घरकामासाठी (10/12/ 24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC261090}

कुरीअर कंपनीमध्ये पिकअप व डिलीव्हरी साठी त्वरीत मुले पाहिजेत. ठिकाण- फोर्ट, दादर, लोअरपरेल, वडाळा, नवी मुंबई. दररोज रोख ८००/- + प्रवास खर्च. SPEEDMAN EXPRESS 191-B, 9th Cavel Cross lane, 1st floor, Dr. viegas street, Near Barretto high School, Chirabazar, Mumbai-400002. Note- फोन न करता ऑफीसमध्ये येणे. {NC261127}

बोरीवलीत नामांकित कोचिंग क्लासेसला- योगीनगर आणि गोराई ब्रॅन्चकरीता (झाडु-पोता-सफाई) तसेच किरकोळ कामासाठी मुलगा पाहिजेत. (वय २० ते ४० पर्यंत) संपर्कः **9223369408** (स्कुटर चालवण्याचे ज्ञान आवश्यक) {NC261092}

## पाहिजेत

हेडलबर्ग सिंगल कलर प्रिंटर, बॉयलर, पंचिंग ऑपरेटर लॅमिनेशन मशीन ऑपरेटर, पेपर, प्रिंटिंग अनुभव असलेले सुपरवायझर पाहिजेत डोंबिवली स्टेशन पासून पिकप ड्रॉप ची सुविधा श्री साई ग्राफिक्स मानकोली नाका भिवंडी. मो.नं. **9167736969** {NC261074}

**तातडीने कर्मचारी हवे आहेत**
❖ ऑफिस बॉय / Peon
❖ ऑफिसमधील कामांसाठी कर्मचारी हवा आहे.
ठिकाण :- कफ परेड, चर्चगेट, मुंबई.
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.
**संपर्क : 90040 77388**

नोकरीची सुवर्ण संधी सुरक्षारक्षक कंपनीला डोंबिवली, मुंबई व नवी मुंबईकरिता अनुभवी फिल्ड ऑफीसर व सुरक्षारक्षक पाहिजेत. संपर्कः **9320131178** {NC261087}

गोरेगाव येथे टूरिस्ट अनुभवी ड्राईवर पाहिजेत. सम्पर्क- **7738052900** {NC260973}

माहिम पश्चिम स्टेशनजवळ १ वर्ष अनुभवी एसी टेक्निशियन पाहिजेत. संपर्क **9004782942.** {NC261076}

बाइंडिंगसाठी कारागीर आणि हेल्पर मुले आणि मुली पाहिजे कटींग मशीन ऑपरेटर पाहिजे भिवंडीसाठी हवे आहेत कैलाश गुप्ता- **7977660618** {NC261124}

## पाहिजेत

ऑफिस असिस्टंट पाहिजे राहण्याची आणि जेवण्याची सोय केली जाईल फोन **8421670520** {NC261106}

वसई/ मालाडमध्ये हॅन्डप्रेसच्या कामासाठी मुले/ मुली पाहिजेत प. 18000/- : **9833730360** {NC261134}

भांडुपमध्ये तिरुपती कुरीयरसाठी डिलीव्हरी बॉयज आणि ऑफिससाठी मुलगी पाहिजे. **-08320458944.** {NC261129}

साकुराई स्क्रिन प्रिंटिंग मशीन, स्क्रीन / स्पॉट UV प्रिंटिंग मशीनसाठी ऑपरेटर पाहिजेत. स्क्रीन एक्सपोजिंग साठी ऑपरेटर पाहिजेत. आकर्षक पगार, पन्नालाल कंपाउंड,भांडुप (प.) **9619585411, 7021415320** {NC261132}

कांदिवली येथे अनुभवी Tally/GST करिता फिमेल (२५-३५) बायोडाटा- **9820454421** {NC261131}

ड्रीम्स हॉलिडे कांदिवली ऑफिसमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजे. **8850238132, 9082602172** {NC261130}

## पाहिजेत

सिनिअर के.जी. विद्यार्थ्यांना शिकवण्याकरिता पदवीधर/ बारावी/ डी.एड. मुलगी किंवा लेडीज यांनी संपर्क साधावा सौ. मंगल भागवत वाकचौरे बि.नं.- 151/ 5074 नेहरूनगर कुर्ला (पूर्व), मुंबई 24 मोबाईलः **9082628761** {NC261133}

ड्रायव्हर्स पाहिजेत. अनुभवी, टी आर लाईसेंस आवश्यक. पगार 18000 ते 21000. संपर्कः **9920925129** {NC261132}

## Situation Vacant

House maid 24 hours salary, Stay, Food, Cloths provided. **9833286296** {NC261090}

## व्यवसायविषयक

महिला/ मुलींना फक्त ६ महिन्यात 10,00,000/- कमवून देणारे जीवन विमा मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC261097}

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC261089}

## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# ६ फुटांहून मोठ्या पीओपी गणेशमूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्त्रोतांत करू द्या

पान १ वरून

पीओपी गणेश मूर्ती बनवणाऱ्या मूर्तिकारांनी याचिकेद्वारे आव्हान दिले आहे.

न्या. अजय गडकरी आणि न्या.कमल खाटा यांच्या खंडपीठासमोर बुधवारी या याचिकांवर एकत्रित सुनावणी झाली. त्याप्रसंगी राज्य सरकारच्या वतीने महाअधिवक्ता मिलिंद साठे यांनी बाजू मांडली. पीओपीच्या गणेश मूर्तींवर सरसकट बंदी नको, त्याऐवजी गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही सहा फुटांपेक्षा मोठ्या गणेश मूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी साठे यांनी केली. त्याचबरोबर यासंदर्भात सरकारने प्रायोगिक तत्वावर प्रस्तावित केलेली नवी योजनाही साठे यांनी न्यायालयासमोर मांडली. पीओपीच्या गणेश मूर्ती विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी नैसर्गिक जलस्त्रोतांमधून बाहेर काढून त्यांवर प्रक्रिया करून त्यांचा अन्य कामांसाठी पुनर्वापर करावा, अशी ही योजना आहे. योजनेबाबतचे तंत्रज्ञ समितीचे आणि तज्ज्ञ वैज्ञानिकांच्या समितीचा अहवाल साठे यांनी न्यायालयात सादर केला. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणी अंतिम सुनावणी दोन आठवड्यांनंतर घेण्याचे निश्चित केले.

# आजचे राशी भविष्य

शुक्रवार ता. ३ जुलै २०२६
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| | |
|---|---|
| मेष | नवीन नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना संधी मिळतील. घरातील कामांसाठी अधिक वेळ द्यावा लागेल. लोकांच्या गाठीभेटी होतील. |
| वृषभ | तुमच्या मेहनतीने व जिद्दीने कामे पूर्ण कराल. विरोधकांवर मात करण्यात यशस्वी व्हाल. वडीलधाऱ्यांशी जुळवून घ्यावे लागेल. |
| मिथुन | ठरवलेल्या कामांमध्ये अचानक बदल होऊ शकतो. दूरचा प्रवास घडण्याची शक्यता. नोकरीत जबाबदारी घ्यावी लागेल. |
| कर्क | तुमच्यासमोरील अनेक अडचणी हळूहळू दूर होतील. आर्थिक लाभ साधारण राहतील. सरकारी कामांमध्ये वेळ जाईल. आरोग्य सांभाळा. |
| सिंह | दूरचा प्रवास घडू शकतो. जोडीदाराच्या आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. सहकाऱ्यांची साथ लाभेल. |
| कन्या | नोकरीतील कामाचा ताण कमी झाल्याने थोडे हलके वाटेल. आर्थिक लाभ चांगले होतील. आरोग्याच्या किरकोळ तक्रारी उद्भवू शकतात. |
| तूळ | तुम्ही केलेल्या कामाची दखल घेतली जाईल. नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. प्रेमात पूरक प्रतिसाद मिळेल. |
| वृश्चिक | घरातील मंडळींच्या आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. कामाचा ताण जाणवेल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक. |
| धनु | नवीन प्रकल्पात गुंतून राहाल. इतरांचे सहकार्य चांगले राहील. अचानक प्रवास घडू शकतो. आरोग्य सांभाळा. |
| मकर | नोकरीमध्ये इतरांशी वाद टाळावेत. तुमच्या बोलण्याने गैरसमज होऊ शकतात. व्यवसायात चढउतार जाणवतील. |
| कुंभ | नवनवीन प्रकल्प राबवण्याचा प्रयत्न कराल. सहकाऱ्यांशी जुळवून घ्यावे लागेल. आर्थिक व्यवहार जपून करावेत. |
| मीन | योजलेल्या कामांमध्ये अचानक बदलाची शक्यता. खर्च वाढेल. प्रवासात सतर्कता बाळगावी. |

# मुंबईच्या मॅनहोलमध्ये पडून पुन्हा एक मृत्यू

पान १ वरून

अभियंता अभिजित चौघुले, सहाय्यक अभियंता उत्तम पाटील या चार अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. परंतु अधिकाऱ्यांना निलंबित करायचे आणि काही महिन्यांनी त्यांना पुन्हा महत्त्वाच्या जागी कामावर घ्यायचे हे नेहमीच केले जाते. मृत शेख यांच्या कुटुंबियांना १० लाखांची मदत जाहीर केली आहे. या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे आश्वासन दिले. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी महापौरांच्या पाहणी दौऱ्यात त्यांच्या समोरच एक अधिकारी उघड्या मॅनहोलमध्ये पडला होता. त्याची चौकशी सुरू आहे.

आजच्या घटनेची माहिती दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास प्रशासनाला मिळाली. त्यानंतर तब्बल दोन तासांनंतर म्हणजेच दुपारी २ वाजता उपायुक्त संध्या नांदेडकर आणि अन्य वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले. एका नागरिकाचा जीव धोक्यात असताना प्रशासनाकडून झालेला विलंबही संतापजनक होता. घटनास्थळी माध्यमांनी आणि स्थानिकांनी प्रश्न विचारल्यानंतर आयुक्त संध्या नांदेडकर यांनी म्हटले की, वरिष्ठ पातळीवर चर्चा करण्यात आली होती. मी केवळ सूचना देते आणि सर्वांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत, असे सांगितले. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित मॅनहोल परिसरात खासगी कंत्राटदारामार्फत देखभाल आणि दुरुस्तीचे काम सुरू होते. मात्र, काम सुरू असताना सुरक्षेच्या मूलभूत नियमांचे पालन करण्यात आले नव्हते. मॅनहोलचे झाकण पूर्णपणे उघडे ठेवण्यात आले होते. मात्र नागरिकांना इशारा देण्यासाठी कोणतेही बॅरिकेड, सुरक्षा फलक लावण्यात आले नव्हते. हे काम दोन वर्षांपूर्वीच संबंधित कंत्राटदाराला देण्यात आले होते.

महापौर रितू तावडे यांनी सारवासारव करत सगळा दोष खासगी कंत्राटदारावर टाकला. त्या म्हणाल्या की, या कामासाठी कोणतीही वर्क ऑर्डर प्रशासनाने काढली नव्हती. खासगी कंत्राटदाराने हे काम केल्याचे समजते. पावसाचा रेड अलर्ट असताना खासगी कंत्राटदाराने हे काम केले. मॅनहोल उघडे ठेवून ते निघून गेले. ही प्रशासनाची मोठी चूक आहे. मी प्रशासनाला कुठेही पाठीशी घालणार नाही. पावसाळ्यात ही कामे करायची काही गरज नव्हती. मॅनहोल उघडे ठेवू नका. ठेवल्यास त्याला बॅरीकेड लावा, अशा सक्त सूचना दिल्या असतानाही जाणीवपूर्वक निष्काळजीपणा करण्यात आल्याचे दिसते. मी तातडीने संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत. या अधिकाऱ्यांचे नुसते निलंबन नाही तर त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हाही दाखल करा, अशी माझी मागणी आहे. कंत्राटदारावरही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्याला काळ्या यादीत टाकण्यात येणार आहे. (कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकायचे आणि कालांतराने पुन्हा त्यांनाच कंत्राट द्यायचे हाही नेहमीचा खेळ आहे.)

महापालिकेत भाजपाबरोबर सत्तेत असलेल्या शिंदे गटाने थेट पालिका प्रशासनावरच आरोप केले. शिंदे गटाचे उपमहापौर संजय घाडी यांनी या दुर्घटनेचे खापर महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्यावर फोडत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. संजय घाडी म्हणाले की, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. यासाठी महापालिका आयुक्त अश्विनी भिडे याच जबाबदार आहेत. मी ४-५ दिवसांपूर्वी आयुक्तांना पुराव्यांसकट पत्र दिले होते. मॅनहोलचे कंत्राट दोन वर्षांपूर्वी वॉर्ड स्तरावर काढले होते. त्याची मुदत संपली आहे. त्यावर संरक्षण जाळ्या लावण्यात आल्या नसून, काही ठिकाणी तुटल्या आहेत. त्यामुळे चौकशी करून त्याचे दुरुस्ती काम करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी मी केली होती. परवा भेटलो तेव्हाही मी त्यांना आठवण करून दिली होती. पण आयुक्तांनी त्यावर अत्यंत ढिम्म प्रतिक्रिया दिली होती. आता आयुक्तांनी याची जबाबदारी घ्यावी, अशी मी मागणी करतो. आयुक्त अजून किती बळी घेणार आणि त्याची जबाबदारी आमच्यावर टाकणार का?

## २०१७ मध्ये डॉ. अमरापूरकरांचा मुंबईत मॅनहोलमध्ये पडून मृत्यू

२९ ऑगस्ट २०१७ रोजी झालेल्या मुसळधार पावसाने मुंबईला विस्कळीत केले होते. मुंबईतील अनेक सखल भाग जलमय झाले होते. या अतिवृष्टीदरम्यान एक दु:खद घटना घडली. बॉम्बे हॉस्पिटलचे वरिष्ठ डॉ. दीपक अमरापूरकर यांचा मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला होता. दोन दिवसांनी त्यांचा मृतदेह वरळी कोळीवाडा समुद्रात सापडला होता. दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास डॉ. अमरापूरकर आपल्या कामानिमित्त बाहेर पडले होते. लोअर परळ परिसरात आपली गाडी सोडल्यानंतर प्रभादेवी येथील निवासस्थानी पायी जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यावेळी या भागात गुडघाभर पाणी साचले होते. त्यातून मार्ग काढत ते पुढे जात होते. मात्र, ते घरी पोहोचलेच नाहीत. मुसळधार पावसामुळे साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी एल्फिन्स्टन परिसरातील एका मॅनहोलचे झाकण उघडले होते. ही गोष्ट डॉ. अमरापूरकर यांच्या लक्षात आली नाही. ते या उघड्या मॅनहोलमध्ये पडले. त्यांचा मृतदेह तब्बल दोन दिवसांनी वरळी कोळीवाडा परिसरातील समुद्रात आढळला. मूळचे सोलापूरचे असलेले डॉ. दीपक अमरापूरकर हे देशातील नामांकित गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट (पोटविकारतज्ज्ञ) म्हणून ओळखले जात. या घटनेनंतर उघड्या मॅनहोल्सचा मुद्दा ऐरणीवर आला होता. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी चार जणांना अटक केली होती. या घटनेनंतर मुंबई महानगरपालिकेने धोकादायक मॅनहोलच्या आत संरक्षक लोखंडी जाळ्या बसवण्याचा निर्णय घेतला होता.

पूर्ण झालेले नाही. याची कल्पना आपण यापूर्वीच अधिकाऱ्यांना दिली होती. या घटनेवरून बोध घेऊन महानगरपालिकेने आपली जबाबदारी स्वीकारावी. उबाठाच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनीही घटनास्थळी भेट देत या घटनेवरून प्रशासनावर जोरदार टीका केली. त्या म्हणाल्या की, मुंबईकरांना पूर्णपणे वाऱ्यावर सोडण्यात आले आहे. डॉ. दीपक अमरापूरकर मॅनहोलमध्ये वाहून गेल्यानंतर सर्व मॅनहोलवर संरक्षक जाळ्या बसवण्याची तरतूद करण्यात आली होती. जाळ्या बसवण्याचे कामही सुरू झाले होते. गेल्या काही वर्षांत त्या व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले आणि आजही परिस्थिती फारशी बदललेली दिसत नाही. पावसाळ्यापूर्वी सर्वपक्षीय गटनेत्यांच्या आढावा बैठका होणे आवश्यक असते. मात्र, यंदा त्या बैठका प्रभावीपणे झाल्या नाहीत. पावसाळ्यापूर्वीची सर्व कामे ३१ मेपूर्वी पूर्ण होणे अपेक्षित होते. ती वेळेत पूर्ण झालेली दिसत नाहीत. पावसाळ्यापूर्वी गटनेत्यांची बैठक मे महिन्यातच होणे आवश्यक होते. त्या बैठकीत प्रत्येक वॉर्डमधील धोकादायक ठिकाणांची माहिती नगरसेवक आणि गटनेते प्रशासनाला देत असतात. (किशोरी पेडणेकर रोज कॅमेरा पुढे येतात तेव्हा याआधी त्यांनी या तक्रारी करीत आंदोलन का केले नाही? असा प्रश्न विचारला जात आहे.)

मनसे नगरसेवक यशवंत किल्लेदार म्हणाले की, अशा प्रकारच्या घटनांची संख्या वाढत आहे. चुकांवर केवळ तात्पुरते उपाय केले जातात. काही अधिकाऱ्यांना निलंबित करून ठराविक काळासाठी बदलले जाते. पण काही काळानंतर त्यांना पुन्हा घेतले जाते. ही पद्धत चुकीची आहे. कारण यामुळे बदल होत नाही. अभियंत्यांकडूनही पूर्ण तपासणी केली जात नाही. प्रशासनाने योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांवरही आहे. कारण शासन आणि प्रशासन हाताळण्यात ते अपयशी ठरत आहेत. (सर्वांना सर्व माहीत आहे पण बदल घडावा इतका जोर कोणताच पक्ष लावत नाही.)

या घटनेनंतर मुंबईकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मुंबईत अजून किती जणांचा बळी गेल्यानंतर प्रशासन जागे होणार? असा

## विशेष समितीकडून चौकशी! पालिका आयुक्तांची प्रतिक्रिया

आजच्या दुर्घटनेचे खापर पालिका प्रशासनावर फुटल्यानंतर आयुक्त अश्विनी भिडे यांनी आकडेवारी सादर करत प्रतिक्रिया दिली. त्यांनी सांगितले की, मुंबई महापालिकेकडून शहरातील सुमारे १३,९२६ मॅनहोलवर संरक्षक जाळ्या बसविण्यात आल्या आहेत. यामध्ये पर्जन्य जलवाहिन्या (स्टॉर्म वॉटर ड्रेन्स) आणि मलनिस्सारण वाहिन्यांमधील मॅनहोलचा समावेश आहे. सुमारे १,८०० हून अधिक मॅनहोलवरील जाळ्या तात्पुरत्या हटविण्यात आल्या होत्या, तर ४,४४६ मॅनहोलची विविध कामे करण्यात आली. संबंधित कामे पूर्ण होताच त्या ठिकाणी पुन्हा जाळ्या आणि झाकणे बसविण्याची प्रक्रिया सुरु आहे. यासंदर्भातील माहिती उच्च न्यायालयातही सादर करण्यात आली आहे. 'एल' वॉर्डमध्ये काही दिवसांपूर्वी ७५ मॅनहोलवर जाळ्या बसविण्याचे काम प्रलंबित होते. मात्र आता केवळ चार मॅनहोलवर जाळ्या बसविण्याचे काम शिल्लक आहे. दुर्दैवाने, या चारपैकी एका मॅनहोलवर काम सुरू असताना आवश्यक सुरक्षा नियमांचे पालन करण्यात आले नसल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. मॅनहोलची झाकणे अत्यंत जड आणि आयताकृती आकाराची असल्याने त्यावर काम करताना विशेष दक्षता घेणे आवश्यक असते. संबंधित कंत्राटदार आणि कामगारांनी बॅरिकेड उभारणे, ट्रायपॉड बसविणे तसेच इतर आवश्यक सुरक्षा उपाययोजना करणे बंधनकारक होते. सीसीटीव्हीच्या तपासणीत या सुरक्षा नियमांचे पालन झाले नसल्याचे दिसून आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीत अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) तसेच उपायुक्त (पायाभूत सुविधा) यांचा समावेश असून, ही समिती संपूर्ण घटनेची चौकशी करून अहवाल सादर करणार आहे.

ही घटना घडली तेथील शिंदे गटाचे स्थानिक आमदार दिलीप लांडे यांनी आरोप केला की, आधी आचारसंहिता, त्यानंतर मुंबई महानगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया आणि मग अर्थसंकल्पीय कामकाज यामुळे यंदाची नालेसफाई वेळेत पूर्ण होऊ शकली नाही. पालिकेने नालेसफाईचे कंत्राट उशिरा काढले. यामुळे नालेसफाईचे काम समाधानकारक झालेले नाही. ५० टक्के कामदेखील प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. प्रत्येक पावसाळ्यात मान्सुनपूर्व तयारीचे दावे केले जातात, कोट्यवधी रुपयांची कामे झाल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात नागरिकांना जीवघेण्या निष्काळजीपणाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप होत आहे. वकील पंकज मिश्रा यांनी या घटनेची मानवधिकार आयोगाकडे तक्रार केली आहे.

## आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी

सोडत दर गुरुवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 27 • सोडत दिनांक 02/07/2026

| | |
|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | AP-08 : 4973 |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 4973 — चंदन लॉटरी एजन्सिज - अमरावती; महाराजा असोसिएट्स - इचलकरंजी |
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 5452 — श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे; वैभवी लॉटरी - बोरिवली |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 5741 — प्रिन्स लॉटरी सेंटर ॲण्ड वसंत स्टोअर्स - कल्याण; सिद्धी लॉटरी एजन्सी - मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 1123 | 2210 | 3951 | 4692 | 4788 | 4799 | 5398 | 5647 | 7788 | 7921 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1436 | 2580 | 3642 | 3661 | 4437 | 4485 | 4993 | 5349 | 5357 | 6587 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1295 | 2287 | 2611 | 2618 | 3091 | 3892 | 6216 | 7392 | 7497 | 7569 |

सातवे बक्षीस रु. 110/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1000 | 1441 | 1978 | 2502 | 2954 | 3496 | 4054 | 4468 | 5114 | 5620 | 6126 | 6601 | 7086 | 7627 |
| 1019 | 1454 | 1980 | 2525 | 2992 | 3518 | 4058 | 4472 | 5160 | 5635 | 6157 | 6612 | 7088 | 7647 |
| 1061 | 1520 | 2024 | 2529 | 3007 | 3543 | 4138 | 4495 | 5168 | 5700 | 6169 | 6621 | 7107 | 7664 |
| 1081 | 1532 | 2112 | 2534 | 3009 | 3562 | 4158 | 4550 | 5173 | 5751 | 6171 | 6626 | 7113 | 7669 |
| 1100 | 1582 | 2145 | 2545 | 3033 | 3606 | 4167 | 4560 | 5184 | 5758 | 6176 | 6636 | 7114 | 7677 |
| 1116 | 1584 | 2147 | 2548 | 3035 | 3614 | 4169 | 4581 | 5185 | 5800 | 6186 | 6642 | 7157 | 7700 |
| 1125 | 1597 | 2178 | 2593 | 3057 | 3618 | 4178 | 4652 | 5198 | 5815 | 6196 | 6655 | 7170 | 7702 |
| 1136 | 1618 | 2192 | 2620 | 3165 | 3639 | 4182 | 4743 | 5210 | 5839 | 6220 | 6672 | 7171 | 7735 |
| 1141 | 1658 | 2196 | 2622 | 3226 | 3644 | 4236 | 4758 | 5216 | 5853 | 6226 | 6676 | 7202 | 7737 |
| 1143 | 1659 | 2212 | 2623 | 3232 | 3681 | 4246 | 4771 | 5245 | 5856 | 6265 | 6692 | 7228 | 7752 |
| 1145 | 1668 | 2226 | 2649 | 3258 | 3687 | 4274 | 4788 | 5300 | 5862 | 6288 | 6712 | 7258 | 7771 |
| 1146 | 1681 | 2237 | 2669 | 3283 | 3781 | 4305 | 4795 | 5310 | 5891 | 6375 | 6728 | 7298 | 7789 |
| 1165 | 1687 | 2250 | 2681 | 3293 | 3782 | 4346 | 4804 | 5356 | 5905 | 6384 | 6738 | 7308 | 7809 |
| 1170 | 1751 | 2262 | 2702 | 3295 | 3803 | 4347 | 4887 | 5357 | 5908 | 6386 | 6763 | 7319 | 7811 |
| 1173 | 1769 | 2278 | 2720 | 3309 | 3807 | 4376 | 4985 | 5385 | 5915 | 6388 | 6768 | 7351 | 7817 |
| 1174 | 1781 | 2283 | 2722 | 3321 | 3812 | 4388 | 4993 | 5485 | 5935 | 6398 | 6852 | 7383 | 7839 |
| 1189 | 1810 | 2318 | 2764 | 3323 | 3892 | 4414 | 5008 | 5501 | 5950 | 6423 | 6857 | 7406 | 7872 |
| 1271 | 1816 | 2352 | 2792 | 3326 | 3893 | 4415 | 5028 | 5511 | 5959 | 6442 | 6944 | 7458 | 7874 |
| 1272 | 1841 | 2388 | 2802 | 3332 | 3915 | 4421 | 5045 | 5535 | 6001 | 6453 | 6964 | 7461 | 7916 |
| 1308 | 1842 | 2392 | 2876 | 3371 | 3933 | 4425 | 5054 | 5546 | 6006 | 6461 | 6966 | 7504 | 7929 |
| 1319 | 1855 | 2418 | 2895 | 3393 | 3936 | 4428 | 5056 | 5557 | 6014 | 6490 | 6969 | 7538 | 7937 |
| 1328 | 1913 | 2422 | 2899 | 3397 | 3938 | 4433 | 5058 | 5558 | 6045 | 6534 | 6975 | 7574 | 7943 |
| 1335 | 1921 | 2452 | 2922 | 3413 | 3943 | 4444 | 5073 | 5574 | 6081 | 6555 | 6989 | 7575 | 7959 |
| 1351 | 1955 | 2482 | 2926 | 3433 | 3968 | 4450 | 5077 | 5598 | 6088 | 6567 | 7005 | 7576 | 7970 |
| 1352 | 1973 | 2492 | 2952 | 3478 | 4044 | 4455 | 5112 | 5612 | 6089 | 6596 | 7076 | 7619 | 7975 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. ३/७/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | २ | ७ |
| १३ | २३ | ७३ |
| १८ | २८ | ७८ |
| २९० | १३८ | १६० |
| ३८० | ४८० | ४६७ |

# लॉटरी

## गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी

निकाल • सोडत वेळ 5:00 वाजता
सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 27 • तिकीट कि. रु. 10/- • सोडत दिनांक 02/07/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-01 : 3293 |
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 0153 |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 9458 |
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 5671 — ₹ 2000 ची 5 बक्षिसे = 10,000/- विक्रेते — महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1260 | 1344 | 2976 | 3636 | 4146 | 4642 | 6807 | 8487 | 9153 | 9799 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0332 | 1661 | 2580 | 3812 | 3846 | 5613 | 6894 | 7135 | 7282 | 7893 |

सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1181 | 2176 | 3180 | 4210 | 4954 | 6084 | 7024 | 7779 | 9210 |
| | | 1261 | 2182 | 3183 | 4230 | 5036 | 6219 | 7036 | 7786 | 9286 |
| | | 1371 | 2219 | 3379 | 4346 | 5256 | 6346 | 7129 | 8052 | 9292 |
| 0018 | 0563 | 1374 | 2228 | 3388 | 4451 | 5270 | 6373 | 7141 | 8384 | 9348 |
| 0024 | 0620 | 1429 | 2244 | 3639 | 4455 | 5272 | 6376 | 7170 | 8508 | 9349 |
| 0032 | 0622 | 1545 | 2259 | 3682 | 4484 | 5452 | 6388 | 7171 | 8582 | 9383 |
| 0077 | 0636 | 1564 | 2290 | 3729 | 4535 | 5457 | 6444 | 7176 | 8640 | 9397 |
| 0115 | 0680 | 1710 | 2299 | 3734 | 4548 | 5533 | 6467 | 7300 | 8671 | 9481 |
| 0159 | 0701 | 1739 | 2308 | 3831 | 4663 | 5535 | 6516 | 7347 | 8712 | 9490 |
| 0170 | 0742 | 1745 | 2346 | 3930 | 4755 | 5575 | 6562 | 7372 | 8782 | 9558 |
| 0201 | 0745 | 1748 | 2592 | 3940 | 4774 | 5589 | 6642 | 7377 | 8801 | 9744 |
| 0228 | 0754 | 1819 | 2756 | 3953 | 4787 | 5715 | 6643 | 7446 | 8844 | 9794 |
| 0282 | 0776 | 1820 | 2817 | 4014 | 4839 | 5813 | 6667 | 7594 | 8889 | 9909 |
| 0284 | 0834 | 1904 | 3030 | 4084 | 4843 | 6006 | 6850 | 7679 | 8983 | 9922 |
| 0402 | 0872 | 2036 | 3103 | 4140 | 4897 | 6048 | 6876 | 7731 | 8990 | 9970 |
| 0500 | 1133 | 2125 | 3152 | 4180 | 4929 | 6066 | 6987 | 7771 | 9196 | 9979 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी

निकाल • महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत वेळ 4:45 वाजता
सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 27 • तिकीट कि. रु. 20/- • सोडत दिनांक 02/07/2026

| | |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-09 : 4848 — किशोर लॉटरी सेंटर, सांगली |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3555 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3031 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1173 | 1288 | 2699 | 2808 | 2885 | 3058 | 3185 | 3879 | 3957 | 5090 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1065 | 1274 | 1468 | 2863 | 3515 | 4193 | 4490 | 4597 | 5694 | 5955 |

सहावे बक्षीस रु. 250/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1037 | 1184 | 1852 | 2253 | 2530 | 2965 | 3360 | 4241 | 4889 | 5539 |
| 1091 | 1304 | 1866 | 2284 | 2556 | 2967 | 3363 | 4370 | 4946 | 5549 |
| 1094 | 1409 | 1918 | 2299 | 2592 | 3003 | 3455 | 4461 | 5010 | 5597 |
| 1106 | 1412 | 1961 | 2320 | 2694 | 3046 | 3536 | 4503 | 5054 | 5599 |
| 1111 | 1415 | 2018 | 2322 | 2730 | 3048 | 3545 | 4510 | 5133 | 5705 |
| 1137 | 1486 | 2033 | 2326 | 2786 | 3063 | 3637 | 4608 | 5240 | 5770 |
| 1145 | 1561 | 2105 | 2357 | 2824 | 3113 | 3732 | 4681 | 5359 | 5786 |
| 1147 | 1617 | 2149 | 2382 | 2864 | 3127 | 3773 | 4707 | 5421 | 5850 |
| 1157 | 1715 | 2153 | 2472 | 2882 | 3267 | 3828 | 4784 | 5426 | 5897 |
| 1176 | 1830 | 2243 | 2473 | 2891 | 3350 | 3875 | 4841 | 5530 | 5928 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# मनपा आयुक्तांच्या दालनात आंदोलन

पान १ वरून - उद्ध्वस्त झाले आहे. याच रुग्णालयात १७ मार्च २०२६ रोजी ३२ वर्षीय गर्भवती प्रतीक्षा उदय खांडेकर यांचाही उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. त्याचे पती उदय खांडेकर यांनी सांगितले की, माझी पत्नी साडेआठ महिन्यांची गर्भवती होती. इंजेक्शनचा ओव्हरडोस झाल्यामुळे तिचा मृत्यू झाला. चार महिने उलटूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. याची माहिती मिळताच मनसे व शरद पवार गटाने महापालिका मुख्यालयात आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन करत प्रशासनाला जाब विचारला. आंदोलनादरम्यान आयुक्तांच्या दालनाबाहेर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मनसे कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेत दालनात घुसण्याचा प्रयत्न केला, यावेळी पोलीस आणि कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली. मनसे नेते गजानन काळे यांनी आरोप केला की, यापूर्वीही अशाच प्रकारे गर्भवतीचा मृत्यू झाला असताना संबंधित औषधांचा वापर थांबवला गेला नाही. तरीही तेच इंजेक्शन पुन्हा देण्यात आले. हे अत्यंत गंभीर असून दोषींवर गुन्हा दाखल करून तात्काळ कारवाई करावी. या प्रकरणावर नवी मुंबई महापालिकेच्या आरोग्य समितीचे सभापती डॉ. जयाजी नाथ यांनी स्पष्टीकरण देत सांगितले की, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत जे. जे. रुग्णालयाचे विभाग प्रमुख, नवी मुंबई स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ सोसायटीचे सदस्य, तसेच महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा समावेश आहे. उपचारात नेमकी काय चूक झाली, औषधांचा चुकीचा डोस देण्यात आला का, याची निष्पक्ष तपासणी केली जाईल. दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल.

## महाराष्ट्र सह्याद्री • दीपलक्ष्मी विकली लॉटरी •

निकाल • महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत वेळ 4:30 वाजता
सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 27 • तिकीट कि. रु. 30/- • सोडत दिनांक 02/07/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SD-00 : 2320 |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5319 — ₹ 5000 ची 5 बक्षिसे = 25,000/- विक्रेते — किशोर लॉटरी सेंटर, सांगली |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1392 | 1450 | 1600 | 1629 | 2632 | 3022 | 3672 | 3750 | 4845 | 4897 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1159 | 1347 | 1506 | 1687 | 3920 | 4175 | 4241 | 4526 | 4850 | 5438 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1286 | 1877 | 1960 | 2508 | 2838 | 4078 | 4390 | 4427 | 4746 | 5742 |

सहावे बक्षिस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2125 | 2725 | 3097 | 3573 | 4712 | 5115 |
| | | 2127 | 2726 | 3100 | 3698 | 4794 | 5142 |
| 1001 | 1234 | 2143 | 2789 | 3117 | 3768 | 4836 | 5281 |
| 1013 | 1283 | 2221 | 2855 | 3123 | 3835 | 4854 | 5306 |
| 1051 | 1299 | 2255 | 2892 | 3183 | 3964 | 4855 | 5381 |
| 1066 | 1332 | 2257 | 2898 | 3277 | 4216 | 4866 | 5399 |
| 1109 | 1481 | 2270 | 2920 | 3320 | 4235 | 4874 | 5430 |
| 1140 | 1510 | 2271 | 2971 | 3350 | 4442 | 4901 | 5524 |
| 1141 | 1523 | 2274 | 2997 | 3362 | 4459 | 4904 | 5560 |
| 1142 | 1717 | 2296 | 3003 | 3377 | 4513 | 4950 | 5568 |
| 1144 | 1729 | 2305 | 3032 | 3437 | 4567 | 4991 | 5659 |
| 1168 | 2082 | 2407 | 3063 | 3452 | 4586 | 5001 | 5768 |
| 1226 | 2088 | 2666 | 3083 | 3565 | 4650 | 5072 | 5895 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# भाजपा आमदार-मंत्री अधिवेशनात सतत गैरहजर

मुंबई

**राज्य** विधिमंडळाच्या सुरू असलेल्या अधिवेशनात भाजपाचे आमदार आणि मंत्री वारंवार गैरहजर राहत असल्याने भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नाराजी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आमदारांवरील कारवाईबाबत चर्चा करणार असल्याची माहिती आहे.

अधिवेशनाच्या पहिल्याच आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व आमदार आणि मंत्र्यांना विधानसभा तसेच विधानपरिषदेत उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या होत्या.



मात्र, अधिवेशनाचा दुसरा आठवडा सुरू असतानाही अनेक आमदार व मंत्री अनुपस्थित राहत आहेत. या गैरहजेरीमुळे सभागृहातील कामकाजावर परिणाम होत आहे. विरोधी पक्षांकडून उपस्थित केले जाणारे जनतेचे प्रश्न योग्यरीत्या हाताळले जात नाहीत. काही वेळा संबंधित मंत्री गैरहजर असल्याने सभागृहाचे कामकाज तहकूब करण्याची वेळ येत असल्याचेही निदर्शनास

### रवींद्र चव्हाणांनी व्यक्त केली नाराजी

आल्याने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन अनुपस्थित आमदार आणि मंत्र्यांवर कोणती कारवाई करावी, याबाबत चर्चा करणार आहेत. पक्ष संघटनेतही या मुद्द्यावर भूमिका स्पष्ट केली जाणार असल्याचे सांगितले जात आहे.

# स्मार्ट मीटरमुळे दुप्पट बिले सरकारने स्पष्टीकरण करावे

मुंबई

सोलापूर शहरात स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वीजबिलांमध्ये मोठी वाढ झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात येत असल्याचा मुद्दा उपस्थित करत आमदार देवेंद्र कोठे यांनी शासनाकडे स्पष्टीकरणाची मागणी केली आहे. कोठे म्हणाले की, स्मार्ट मीटर बसवल्यानंतर अनेक ग्राहकांची वीजबिले दुप्पट, तर काही ठिकाणी त्याहूनही अधिक वाढून येत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्मार्ट मीटरसंदर्भात शासनाचे नेमके धोरण काय आहे, वाढीव बिलांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यावर कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

# वसतिगृहांचे नियमित ऑडिट करा! नाना पटोलेंची मागणी



मुंबई

**स्वयंसेवी** संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या वसतिगृहांमधील आर्थिक गैरव्यवहार आणि कर्मचाऱ्यांच्या शोषणाचा मुद्दा विधानसभेत काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी उपस्थित केला. विद्यार्थ्यांच्या हक्कांचा विचार करून या वसतिगृहांचे नियमित आणि काटेकोर ऑडिट करण्याची मागणी त्यांनी केली.

पटोले म्हणाले की, शासनाकडून वसतिगृहांसाठी नियमित निधी दिला जात असतानाही तो योग्य प्रकारे खर्च होतो का, याबाबतही शंका निर्माण होत आहे. तसेच कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन मिळते का आणि विद्यार्थ्यांसाठी मंजूर असलेला प्रति विद्यार्थी २,२०० रुपयांचा परिपोषण निधी प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो का, याची तपासणी होणे आवश्यक आहे. काही ठिकाणी विद्यार्थ्यांचे आर्थिक शोषण होत आहे.

या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले की, स्वयंसेवी संस्थांवर जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांमार्फत नियंत्रण ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच आर्थिक लेखापरीक्षण करून वित्तीय अनियमितता रोखण्यासाठी आवश्यक आदेश लवकरच जारी केले जातील. अनियमिततेची चौकशी करून संपूर्ण व्यवस्थेत सुसूत्रता आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

# सीबीएसई शाळांकडून पुस्तकांची सक्ती खपवून घेतली जाणार नाही

### शिक्षणमंत्री दादा भुसेंचा इशारा

मुंबई

**राज्यातील** खासगी आणि सीबीएसई शाळांकडून विद्यार्थ्यांना शाळेने निश्चित केलेल्या दुकानातूनच पुस्तके, वह्या आणि शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास भाग पाडल्याच्या तक्रारींवर राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. अशा प्रकारची सक्ती कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही. तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित शाळांवर कारवाई करण्यात येईल, असे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत स्पष्ट केले. लेखी उत्तरात दादा भुसे यांनी सांगितले की, शासनाने कोणत्याही शाळेला विशिष्ट दुकानातूनच शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची सक्ती करण्याची परवानगी दिलेली नाही. अशा प्रकारच्या तक्रारी आल्यास शालेय शिक्षण विभागाकडून संबंधित शाळांची चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल. काही शाळांना याप्रकरणी आधीच नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. दरम्यान, खासगी शाळांकडून पालकांवर टाकल्या जाणाऱ्या आर्थिक बोजाबाबत विधानसभेत जोरदार चर्चा झाली. यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी अशा शाळांवर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा केली.




# शासकीय दारवल्यांच्या नावारवाली नागरिकांची आर्थिक फसवणूक

### गंभीर मुद्दा शंकर जगतापांनी उपस्थित केला

मुंबई



**पिंपरी-चिंचवड** शहरात उत्पन्न, जात, अधिवास, नॉन क्रिमीलेअर आणि तात्पुरता रहिवासी दाखल्यांच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचा गंभीर मुद्दा चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत उपस्थित केला. शहरात विविध प्रमाणपत्रांसाठी वाढती गर्दी होत असताना महा-ई-सेवा केंद्रांवर शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जास्त रक्कम आकारली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

यावर उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, दहावी-बारावीच्या परीक्षेनंतर महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेसाठी उत्पन्न, जात, अधिवास (डोमिसाईल), नॉन क्रिमीलेअर, तात्पुरता रहिवासी आदी प्रमाणपत्रांची मोठ्या प्रमाणावर मागणी वाढते. त्यामुळे 'आपले सरकार', सेतू केंद्र, नागरी सुविधा केंद्र तसेच महा-ई-सेवा केंद्रांवर नागरिकांची गर्दी होत आहे. शहरातील सेतू केंद्र तसेच तालुक्यातील १४६ महा-ई-सेवा केंद्रांद्वारे प्रमाणपत्रांचे वितरण केले जाते. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत एकूण १२,०४२ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. तर एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत २०,१७१ दाखले मंजूर करून देण्यात आले आहेत. शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम घेतल्याची कोणतीही तक्रार प्रशासनाकडे आलेली नाही. तसेच महा-ई-सेवा केंद्रांची वेळोवेळी तपासणी केली जात असून ८ एप्रिल २०२५ रोजी मंडळनिहाय तपासणी करण्यात आली आहे. २० मे २०२६ रोजीही नायब तहसीलदार आणि मंडळ अधिकाऱ्यांना तपासणीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# माथाडी कामगारांच्या भूरवंड हस्तांतरणाचे आरोप फेटाळले

**मुंबई** - मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील माथाडी कामगारांच्या गृहनिर्माणासाठी राखीव असलेल्या सुमारे २७ एकर भूखंडाच्या हस्तांतरण आणि पुनर्विकासाच्या मुद्द्यावर विधानसभेत चर्चा झाली. या भूखंडाच्या व्यवहारात अनियमितता आणि मोठ्या प्रमाणात मुद्रांक शुल्क चोरी झाल्याचे आरोप करण्यात आले होते. अशा प्रकारची बाब निदर्शनास आलेली नसल्याचे सांगत यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत आरोप फेटाळले.

याबाबत चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, हा शासकीय भूखंड मूळतः कापड बाजार व दुकान मंडळ, मुंबई यांना ९० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्यात आला होता. त्यानंतर विशाल सह्याद्री नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेला निवासी वापरासाठी आणि इतर उद्देशांसाठी एकूण सुमारे २७ एकर क्षेत्र प्रदान करण्यात आले.

# आमदार साजिद पठाण यांना बिश्नोई गँगची पुन्हा धमकी

मुंबई

**अकोला** पश्चिमचे काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांना काल लॉरेन्स बिश्नोई गँगकडून पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणामुळे विधानसभेत आज मोठा गदारोळ झाला. काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून हा मुद्दा सभागृहात उपस्थित करत राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पठाण यांना बिश्नोई गँगकडून यापूर्वी १७ फेब्रुवारी रोजी खंडणीची मागणी करण्यात आली होती. जर चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टी यांना २५ सुरक्षारक्षक दिले जाऊ शकतात, तर जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदारांना तशीच सुरक्षा का दिली जात नाही? असा सवाल

### विधानसभेत गदारोळ



उपस्थित करत वडेट्टीवार यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून साजिद पठाण यांना तातडीने अतिरिक्त सुरक्षा देण्याची मागणी केली.

वडेट्टीवार यांच्याप्रमाणेच काँग्रेसचे नाना पटोले यांनी या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून आमदार पठाण यांना तातडीने अतिरिक्त सुरक्षा देण्याची मागणी केली. यावर मंत्री नितेश राणे म्हणाले की, सर्व आमदारांची सुरक्षा ही सरकारची जबाबदारी असून त्याबाबत कारवाई केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी विधानसभेला आधीच दिले आहे. विरोधी पक्ष या मुद्द्याचे राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. या मुद्द्यावरून मंत्री नितेश राणे आणि काँग्रेस आमदारांमध्ये तीव्र खडाजंगी झाली. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मध्यस्थी करून लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेची जबाबदारी शासनाची असून धोका लक्षात घेऊन आवश्यक ते संरक्षण दिले जाईल, असे आश्वासन सभागृहाला दिले.

# शेतकरी प्रश्नावरून विरोधकांचा सभात्याग

मुंबई

**राज्यातील** वाढत्या शेतकरी आत्महत्यांचा गंभीर मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्याची संधी नाकारल्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या आमदारांनी सभात्याग केला. काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे या विषयावर तातडीने चर्चा घेण्याची मागणी केली होती. वडेट्टीवार म्हणाले की, पावसाळी अधिवेशन चालू असतानाच लातूर येथे दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची घटना अत्यंत चिंताजनक आहे. यावर सरकारने त्वरित भूमिका स्पष्ट करावी. राज्यात वाढते आर्थिक संकट, शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा आणि आत्महत्यांची मालिका या पार्श्वभूमीवर सभागृहात सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. मात्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही चर्चा नाकारून औचित्याचे मुद्दे सुरू केले.

# अमेरिका करारासह जेरुसलेममध्ये कायमस्वरूपी दूतावास उभारणार

### ७.७ एकर जागा नवीन दूतावासासाठी निश्चित

जेरुसलेम

**अमेरिकेने** जेरुसलेममध्ये नवीन कायमस्वरूपी दूतावास उभारण्याबाबत करारावर स्वाक्षरी केली. जेरुसलेममध्ये आयोजित समारंभात इस्त्रायलचे परराष्ट्र मंत्री गिडेन सार आणि अमेरिकेचे राजदूत माइक हकाबी यांनी दूतावासच्या भूखंड वाटपाच्या करारावर स्वाक्षरी केली. हा दूतावास दक्षिण जेरुसलेममधील लनबी कंपाऊंड या जागेवर उभारला जाईल.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी डिसेंबर २०१७ मध्ये जेरुसलेमला इस्त्रायलची राजधानी म्हणून मान्यता दिली होती आणि



२०१८ मध्ये दूतावास तेल अवीवहून जेरुसलेममध्ये हलवला होता. या करारानुसार जेरुसलेममधील दक्षिण भागात असलेल्या ॲलनबी संकुलाची ७.७ एकर जागा नवीन कायमस्वरूपी दूतावासासाठी निश्चित केली.

ही जागा अमेरिकन सरकारला वर्षाला फक्त १ डॉलर या नाममात्र दराने भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे. सध्याचा अमेरिकन दूतावास हा एका तात्पुरत्या इमारतीमधून कार्यरत आहे. आता या करारानुसार नवीन आणि भव्य दूतावास इमारतीच्या बांधकामाचा मार्ग मोकळा झाला आहे. इस्त्रायलने या कराराला दोन्ही देशांमधील 'अतुट मैत्रीचा मैलाचा दगड' म्हटले. तर दुसरीकडे पॅलेस्टिनी नागरिक आणि आंतरराष्ट्रीय समुदायातील काही घटकांकडून या ऐतिहासिक निर्णयाला विरोध केला जात आहे, कारण पॅलेस्टिनींना पूर्व जेरुसलेम ही त्यांच्या भविष्यातील स्वतंत्र राष्ट्राची राजधानी हवी आहे.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणात आणरवी ३ आरोपी ताब्यात

**हाजीपूर** - महाराष्ट्रातील टीईटी पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे थेट बिहारपर्यंत पोहोचल्याचे तपासात उघड झाले आहे. महाराष्ट्र पोलिसांच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) आज बिहार एसटीएफ आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने वैशाली जिल्ह्यातील हाजीपूर येथे मोठी कारवाई केली. हाजीपूरमधील कचहरी रोडवरील सायबर कॅफेवर छापा मारत सायबर कॅफे चालक सोनू कुमार याच्यासह तिघांना ताब्यात घेतले. छापेमारीदरम्यान अनेक महत्त्वाचे डिजिटल पुरावेही जप्त करण्यात आले आहेत.

प्राथमिक चौकशीत सोनू कुमारचा संबंध या प्रकरणातील कथित सूत्रधार बिजेंद्र गुप्ता याच्याशी असल्याचे आढळले आहे. त्यामुळे टीईटी पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला नवे वळण मिळाले असून, या घोटाळ्यामागे बहुराज्यीय रॅकेट कार्यरत असल्याचे सिद्ध होत आहे.

# गुजरात विद्यापीठ कुलगुरू नियुक्ती संघ आपला प्रभाव कायम ठेवणार

अहमदाबाद

**गुजरात** विद्यापीठाच्या नव्या कुलगुरूंच्या नियुक्तीच्या प्रक्रियेवरून राज्यातील सर्वात मोठ्या विद्यापीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वाढता प्रभाव पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. विद्यमान कुलगुरू नीरजा गुप्ता यांचा कार्यकाळ ३० जून रोजी संपला असून, गुजरात सरकार लवकरच हंगामी कुलगुरूची नियुक्ती करणार आहे. शैक्षणिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, या नियुक्तीत संघाच्या पसंतीला महत्त्व दिले जाऊ शकते.


गांधीनगर येथील समर्पण आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य आष दवे यांची संघाशी जवळीक असल्याचे मानले जाते. हे हंगामी कुलगुरूपदासाठी आघाडीचे दावेदार आहेत. दरम्यान, कायमस्वरूपी कुलगुरूंची नियुक्ती करण्यासाठी शोध समितीमार्फत प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र, हंगामी कुलगुरूंची नियुक्तीच विद्यापीठाच्या भविष्यातील नेतृत्वाची दिशा ठरवणारी ठरू शकते.

१ जुलै २०२३ रोजी कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारलेल्या नीरजा गुप्ता यांचा कार्यकाळ आता पूर्ण झाला आहे. त्यांनी पुन्हा एकदा या पदासाठी प्रयत्न केल्याची चर्चा असली, तरी सूत्रांच्या माहितीनुसार त्यांच्या पुनर्नियुक्तीची शक्यता कमी आहे. गुजरात सरकार आणि संघामधील प्रभावी घटक नेतृत्वात बदलाच्या बाजूने असल्याचेही सांगितले जात आहे.गेल्या काही वर्षांपासून गुजरात विद्यापीठाच्या सर्वोच्च पदावर संघाचा पाठिंबा असल्याचे मानल्या जाणाऱ्या व्यक्तींची नियुक्ती होत असल्याचे दिसून आले आहे.

# कचराभूमीचे दूषित पाणी नागरी वस्तीत नागरिकांनी आयुक्तांची गाडी अडवली

वसई

**वसई-विरार** महापालिकेच्या कचराभूमीतील (डंपिंग ग्राऊंड) दूषीत पाणी परिसरातील नागरी वसाहतीत शिरले असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. यामुळे संतप्त नागरिकांनी वसईत पाहणीसाठी आलेल्या पालिका आयुक्तांची गाडी अडवली. आयुक्तांनी डंपिग ग्राऊंडकडे जाण्यास नकार दिल्याने स्थानिक आणि अधिकाऱ्यांमध्ये चांगलाच वाद झाला. वसई पूर्वेच्या भोयदापाडा येथे वसई-विरार महापालिकेची कचराभूमी आहे. पावसामुळे या कचरा भूमीतील दूषित पाणी थेट रस्त्यांवर येत असून स्थानिकांच्या घरांमध्ये शिरू लागले आहे. यामुळे परिसरात भयंकर दुर्गंधी पसरली आहे. आज आयुक्त पृथ्वीराज बी. पी. पूरपरिस्थितीची पाहणी करण्यासाठी वाघरळपाडा येथे आले होते. स्थानिकांनी त्यांची गाडी अडवून कचरा भूमीची पाहणी करण्यासाठी चला असा आग्रह केला.



# अत्याधुनिक सुविधांनंतरही मोनोरेल तोट्यातच प्रवासी क्षमतेची मर्यादा अडथळा ठरणार

मुंबई

**मुंबईची** बहुप्रतीक्षित मोनोरेल सेवा अत्याधुनिक सिग्नलिंग प्रणाली, भारतात तयार करण्यात आलेल्या नव्या रेक्स आणि मेट्रोशी सुधारित जोडणीसह पुन्हा सुरू होण्याच्या तयारीत आहे. मात्र, तांत्रिकदृष्ट्या मोठे आधुनिकीकरण झाले असले तरी मर्यादित प्रवासी वाहतूक क्षमतेमुळे ही सेवा आर्थिकदृष्ट्या तोट्यातच राहण्याची शक्यता आहे.

आधुनिकीकरणानंतर एमएमआरडीए म्हणजेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मोनोरेलच्या वार्षिक परिचालन तोट्यात सुमारे १८० कोटी रुपयांवरून १२० कोटी रुपयांपर्यंत घट होण्याची अपेक्षा व्यक्त करत आहे. मात्र, ही सेवा नफ्यात येण्याची शक्यता कमी असल्याचे सांगितले जात आहे. सीबीटीसी म्हणजे कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल या अत्याधुनिक सिग्नलिंग प्रणालीसाठी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर मोनोरेलच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग मोकळा झाला आहे. सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी एमएमआरडीएने राज्य सरकारकडे परवानगी मागितली होती आणि त्याला मंजुरीही मिळाली आहे.

आधुनिकीकरणाअंतर्गत १० नवीन मोनोरेल रेक्सचा समावेश करण्यात आला असून, विद्यमान रेक्समध्येही सीबीटीसी तंत्रज्ञान बसवण्यात आले आहे. या नव्या सिग्नलिंग प्रणालीमुळे गाड्यांमध्ये सतत संपर्क राहणार असून, कमी अंतराने गाड्या चालवणे, वेळापत्रक अधिक कार्यक्षम करणे आणि सुरक्षितता वाढवणे शक्य होणार आहे. तसेच रिजनरेटिव्ह ब्रेकिंग तंत्रज्ञानामुळे ब्रेक लावताना निर्माण होणारी ऊर्जा पुन्हा वीज प्रणालीत परत पाठवली जाणार आहे.उपनगरीय रेल्वे आणि मेट्रोप्रमाणे मोनोरेलमध्ये निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेता येत नाहीत, कारण ती एकाच उंच मार्गिकेवर धावते.

# मुक्त विद्यापीठाचा ३७ वा वर्धापन दिन उत्साहात

नाशिक

**यशवंतराव** चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी सेवानिवृत्त एअर मार्शल बी. एन. गोखले यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवी बुद्धीची जागा घेऊ शकत नाही, त्यामुळे रोजगाराबाबत व्यक्त होणारी भीती निराधार असल्याचे स्पष्ट केले. मुक्त विद्यापीठाने काळानुसार बदलत कौशल्याधारित व रोजगारक्षम अभ्यासक्रम सुरू करून ज्ञानगंगा घरोघरी पोहोचविण्याचे कार्य सुरू ठेवले असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात डॉ. अशोकराव कुकडे, अनिल मेहेर, प्रा. दिलीप फडके, डॉ. निरुपमा देशपांडे आणि सौ. सीमा कांबळे यांना 'यश जीवनगौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच उत्कृष्ट शिक्षक, कर्मचारी व विभागीय केंद्रांचा गौरव करण्यात आला. कुलगुरू प्रा. डॉ. संजीव



सोनवणे यांनी विद्यापीठातील डिजिटल शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि आगामी ई-गॅरेजसारख्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमास विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

# श्रीकांत शिंदेंनी उद्धव ठाकरेंसमोर पदासाठी अनेकदा रडारड केली

### आमदार अंबादास दानवेंचा आरोप

मुंबई



**शिंदे** गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केलेल्या टीकेला उत्तर देताना विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी जोरदार पलटवार केला आहे. दानवे म्हणाले की, श्रीकांत शिंदे हे उद्धव ठाकरे यांच्याकडे कित्येक वेळा येऊन पदासाठी रडले आहेत, त्यामुळे त्यांनी उद्धव ठाकरेंवर बोलूच नये.

काही खासदार सहा मतदारसंघात जाऊन रडारड करत आहेत, अशी टीका श्रीकांत शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना दानवे म्हणाले की, उद्धवजी ठाकरे साहेबांसमोर श्रीकांत शिंदे कित्येक वेळा येऊन रडलेले आम्ही स्वतः पाहिले आहे. त्यामुळे त्यांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया देणे फार गरजेचे वाटत नाही. यावेळी दानवे यांनी भाजपा नेते मोहित कंबोज यांच्यावरही टीका केली. ते म्हणाले की, मोहित कंबोज हा दलाल आहे. मी यापूर्वी त्यांच्याविषयी बोललो असता भाजपाच्या लोकांचेच मला फोन आले. त्यांनी माझे वक्तव्य योग्य असल्याचे सांगितले.

# जाहिराती वगळण्यासाठी अतिरिक्त शुल्कामुळे ॲमेझॉन अडचणीत

सिडनी

**आघाडीची** ई-कॉमर्स कंपनी ॲमेझॉन कायदेशीर अडचणीत सापडली. प्राईम व्हिडिओवर ग्राहकांच्या संमतीशिवाय जाहिराती सुरू करून अतिरिक्त शुल्क आकारल्याचा आरोप करत ऑस्ट्रेलियाच्या ग्राहक संरक्षण आणि स्पर्धा आयोगाने कंपनीविरोधात खटला दाखल केला. आयोगाच्या म्हणण्यानुसार ॲमेझॉनने आपल्या प्राईम सबस्क्रिप्शन करारातील अटींचा वापर करून २०२४ मध्ये प्राईम व्हिडिओवर जाहिराती सुरू केल्या.


या बदलासाठी ग्राहकांची स्वतंत्र परवानगी घेण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्राहकांसमोर दोन पर्याय ठेवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. जाहिरातींसह कंटेंट पाहणे किंवा जाहिराती टाळण्यासाठी दरमहा अतिरिक्त शुल्क भरणे.

# नीटनंतर नेट परीक्षाही वादात प्रश्नांची पुनरावृत्ती, शुद्धलेरवन चुका

नवी दिल्ली

**नीट परीक्षा** पेपरफुटीमुळे वादात सापडलेली राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेतील १५० पैकी ६७ प्रश्न २०२४ च्या परीक्षेतून जशास तसे घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. तर समाजशास्त्र आणि मानसशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी शुद्धलेखनातील चुका, चुकीची भाषांतरे आणि अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्नांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

भारतीय विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये 'सहाय्यक प्राध्यापक' पदावर नियुक्ती मिळवण्यासाठी आणि कनिष्ठ संशोधन फेलोशिपची पात्रता निश्चित करण्यासाठी यूजीसी नेट परीक्षा घेतली जाते. या परीक्षेच्या माध्यमातून पीएच. डी. प्रवेशासाठीदेखील पात्रता ठरवली जाते. यूजीसी नेटच्या इंग्रजी विषयाच्या पेपर-२ मधील १५० पैकी ६७ प्रश्न २०२४ मधील प्रश्नांशी जुळणारे होते. एवढेच नव्हे, तर उत्तरांच्या पर्यायांचा क्रमही पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# पाकबरोबरच्या संवादाचे बेसूर तुणतुणे

देशाचे अक्षरशः अतोनात नुकसान ज्या पाकिस्तानमुळे झाले आणि अजूनही सातत्याने भारताला धमकावण्याची, काश्मीरच्या विषयावर पुन्हा आक्रमकता दाखवण्याची तसेच भारत सतत अस्थिर कसा राहील यासाठी दहशतवादी कारवाया अखंड चालू ठेवण्याची ज्या देशातल्या पाकिस्तानची प्रवृत्ती आहे, त्या देशाबरोबर संवाद साधण्याचा खरे तर प्रश्नच येत नाही. परंतु भारतातल्या काही मूखंडांना पाकिस्तानप्रेमाचा पुळका आलेला आहे. दोन्ही देशातल्या शंभरापेक्षा अधिक प्रतिष्ठित नागरिकांनी भारत आणि पाकिस्तानच्या पंतप्रधानांना खुलं पत्र पाठवून द्विपक्षीय संवाद सुरू करण्याचे आव्हान केले आहे. ज्यामध्ये भारतातले फारुख अब्दुल्ला, मेहबुबा मुफ्ती, फुटीरतावादी नेता मिरवाईज फारूख, मणीशंकर अय्यर, पाकिस्तानचे माजी परराष्ट्रमंत्री खुर्शिद कसुरी यांचा समावेश आहे. दक्षिणी आसाममध्ये शांतता पूर्ववत होण्यासाठी हा संवाद आवश्यक असल्याचे या सगळ्या पाकिस्तानप्रेमींचे म्हणणे आहे. म्हणजे जणू काही भारताच्या भूमिकेमुळेच दक्षिण आशियातली शांतता धोक्यात असल्याचे या लोकांचे म्हणणे दिसते. आपल्या या पत्रात या लोकांनी दिल्ली-लाहोर बससेवा, समझोता एक्स्प्रेस, कर्तारपूर साहिब कॅरिडॉर, श्रीनगर मुझफ्फराबाद बससेवा, शारदापीठ, हे मार्ग खुले करण्याचीदेखील सूचना केली आहे. परंतु पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद कसा संपुष्टात आणायचा याबद्दल मात्र या पाकिस्तानप्रेमिकांनी सोयीस्कर मौन धारण केलेले आहे. या पत्रातच काश्मिरसंबंधात नव्याने चर्चा सुरू व्हावी असेदेखील आवाहन केले आहे. मात्र या पत्रात पाकिस्तानने बळकावलेला भारताचा भूभाग परत मिळवण्यासंदर्भात एका शब्दानेही उल्लेख केला नाही. या सगळ्या पत्राचा सूर हा पाकिस्तानविषयीची अनावश्यक सहानुभूती दाखवणारा आणि भारतच कसा आडमुठेपणा करतो आहे, हे दाखवून देणारा प्रकार ठरतो. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने अधिक कडक भूमिका स्वीकारली आणि पाकिस्तानबरोबरच्या सिंधू कराराला स्थगिती दिली. भारताच्या या निर्णयाने पाकिस्तानच्या तोंडचे पाणी पळाले. आणि भविष्यकाळात मोठ्या पाणीटंचाईला तोंड द्यावे लागणार आहे. त्याच संकटाची चाहुल लागल्याने हा पाकिस्तानप्रेमाचा दुहेरी पुळका सुरू झालेला आहे.

### फ्रँकेन्स्टाईन देशाबरोबर फ्लर्टिंग अशक्य

गेल्या सत्तर वर्षांचा अनुभव गाठीशी असताना आणि पाकिस्तानच्या दहशतवादात भारत हा जगातला सर्वाधिक पोळलेला देश ठरतो. गेल्या सत्तर वर्षांत सातत्याने पाकिस्तानशी सुसंवाद साधण्याचे शेकडो प्रयत्न झाले. पण त्याला कधीही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. एकीकडे चर्चा करायची आणि दुसरीकडे दहशतवाद्यांना सर्व प्रकारची मदत करायची अशी दुटप्पी भूमिका पाकिस्तानने अवलंबली आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी टॉक्स आणि टेरर असे दोन्ही प्रकार चालू शकत नाही. एकतर टॉक्स म्हणजे चर्चा हवी असेल तर पाकिस्तानला टेरर म्हणजे दहशतवाद बंद करावा लागेल. परंतु पाकिस्तानची ही जन्मजात खोड असल्याने तो दहशतवाद थांबवू शकत नाही. अगदी अलिकडचेच उदाहरण द्यायचे झाले तर १९ जून २०२६ ला संयुक्त राष्ट्राच्या उच्चायुक्तांच्या वार्षिक अहवालाच्या चर्चा सत्रात पाकिस्तानकडून काश्मीरचा मुद्दा पुन्हा एकदा उपस्थित केला गेला. त्यावेळी संयुक्त राष्ट्रातल्या भारताच्या स्थायी मिशनच्या प्रथम सचिव अनुपमा सिंह यांनी इतक्या कडक शब्दांमध्ये पाकिस्तानला सुनावले होते. पाकिस्तान हा फ्रँकेन्स्टाईन देश असल्याचा उल्लेख केला होता. कारण पाकिस्तान हा तोच देश आहे की, ज्याचे संरक्षण मंत्री देशाचा धोरणात्मक भाग म्हणून दहशतवाद्यांना आश्रय देतो. स्वतःच निर्माण केलेला हा राक्षस पाकिस्तानलाच जेव्हा चावा घेतो, त्यावेळी हा देश हादरतो. अशा प्रकारचा विरोधाभास पाकिस्तानमध्ये पाहायला मिळतो. म्हणूनच तिथे आज अन्न, वीज आणि सन्मानाने जगण्याची मागणी करणाऱ्यांनाही बंदुकीच्या गोळ्यांनी उत्तर दिले जाते. अनुपमा सिंह यांनी भारताची संयुक्त राष्ट्र संघात मांडलेली ही अधिकृत भूमिका आहे. आणि अशा फ्रँकेन्स्टाईन देशाबरोबर कोणत्याही प्रकारचे फ्लर्टिंग होऊच शकत नाही. किंबहुना आज ज्या संवादाची मागणी होते आहे तेसुद्धा म्हणजेच फ्रिक्वेन्ट डायलॉग या फ्रँकेन्स्टाईन देशाबरोबर होऊ शकत नाही. पाकिस्तानच्या एका मंत्र्याने भारताचे हात कलम केले जातील अशी भाषा वापरली आहे.

### संघालाही प्रेमाचा पुळका


सातत्याने हिंसक आणि कृतघ्नतेची भाषा वापरणारा पाकिस्तानने भारताचा केवळ स्वतःच्या अस्तित्वासाठी उपयोग करून घेतला. जागतिक स्तरावर कोणतीही पत नसलेल्या या देशाबरोबर भारताने का म्हणून संवाद साधायचा. पाकिस्तानशिवाय भारताचे काहीही अडत नाही. काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सरसंघचालकांनीदेखील असेच पाकिस्तानबरोबरच्या चर्चेचे बेसूर तुणतुणे वाजवले होते. अजूनही लोक फाळणीच्या वेदना विसरू शकत नाहीत. काश्मिरी पंडितांचे किती हाल केले गेले हे काश्मीर फाईल्समधून पुन्हा एकदा जगासमोर आलेले आहे. संपूर्ण काश्मीर सलग तीस वर्षे दहशतीच्या आगीत होरपळत ठेवण्याचे काम पाकिस्तानने केले. अशी पूर्ण फुटीरतावादी प्रवृत्ती असलेल्या देशाबरोबर कधीही चर्चा होऊ शकत नाही. इस्त्रायलसारखा चिमूटभर देश आजुबाजूला एवढे शत्रू असताना स्वाभिमानाने आणि पूर्ण ताकदीनिशी शत्रूंना पुरून उरत असतो. संघाचेच एक प्रचारक ना.ह. पालकर यांनी छळाकडून बळाकडे अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तक लिहीले ज्यातून भारतीयांनी प्रेरणा घ्यावी असा त्यांचा उद्देश होता. पाकिस्तानने दहशतवादातून भारताचा केलेला छळ लक्षात घेतला तर हे पुस्तकदेखील मार्गदर्शक ठरू शकेल. संघाने देशांतर्गत फुटीरतावादी ज्या पाकिस्तानी प्रवृत्ती आहेत त्यांच्याशी किंवा अगदी काश्मीरमधल्या मुस्लिमांशी संवादाचा प्रयत्न करून पाहावा. आणि मगच पाकिस्तानबरोबरच्या संवादाचे गोडवे गावेत. दोन्ही देशातल्या या तथाकथित प्रतिष्ठित लोकांनी संवादाचे आव्हान केले आहे. या सगळ्यांचे खरे मुखवटे वेगळेच आहेत. ज्या पाकिस्तानला प्रतिष्ठाच उरलेली नाही, त्याच्याबरोबर टोकाची भूमिका घेणे हाच एकमेव मार्ग उरतो.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

स्वप्नं मोफत असतात, पण त्यांना पूर्ण करण्यासाठी घाम आणि आयुष्याचं सोनं खर्च करावं लागतं.

**पंचांग**



**शुक्रवार, ३ जुलै २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ कृष्ण तृतीया**
**नक्षत्र : श्रवण**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मकर**

रवी उदय- ०६-०७
रवी अस्त- १९-१९

**संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री ९.५२, सायं. पश्चिमेस बुध लोप**


मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

# यजमान अमेरिकेची उपउपांत्यपूर्व फेरीत धडक

## बोस्निया-हर्झेगोविनावर २-०ने दणदणीत विजय



■ सांता क्लारा

**सॅन फ्रान्सिस्को** बे एरिया स्टेडियमवर झालेल्या फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत यजमान अमेरिकेने बोस्निया-हर्झेगोविनावर २-० च्या फरकाने विजय मिळवून उपउपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. फोलारिन बालोगुन व मलिक टिलमन हे अमेरिकेच्या विजयाचे शिल्पकार ठरले. २०२२च्या फिफा विश्वचषकानंतरचा हा अमेरिकेचा पहिलाच बाद फेरीतील विजय आहे.

या सामन्यात अमेरिकेने सुरुवातीपासूनच दबाव कायम ठेवला. पहिल्या हाफच्या ४५व्या मिनिटाला फोलारिन बालोगुनने अमेरिकेसाठी गोल करून त्यांना १-०अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ६४ व्या मिनिटाला फोलारिनला रेड कार्ड मिळाल्याने त्याला मैदान सोडावे लागले. मात्र एक खेळाडू कमी असूनही अमेरिकेचा आत्मविश्वास डळमळला नाही. दुसऱ्या हाफच्या ८२ व्या मिनिटाला मलिक टिलमन याने दंडक्षेत्राबाहेरून मिळालेल्या मुक्त फटका संधीचे सोने करत अप्रतिम गोल केला. चेंडू बोस्नियाचा गोलरक्षक निकोला वासिल्ज यांच्या हाताला स्पर्श करून जाळ्यात विसावला व अमेरिकेला २-०अशी आघाडी मिळवली आणि विजय निश्चित केला. अमेरिकन मिडफिल्डर मलिक टिलमनला 'मिशेलोब अल्ट्रा सुपीरियर प्लेयर ऑफ द मॅच'म्हणून गौरविण्यात आले. त्याने संपूर्ण सामन्यात उत्कृष्ट खेळ केला आणि एक असा फ्री-किक गोल केला जो अमेरिकन फुटबॉलच्या इतिहासात दीर्घकाळ स्मरणात राहील. मॉरिसिओ पोचेटिनो यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकेच्या संघाने २००२ च्या विश्वचषकाच्या १६ संघांच्या फेरीत ब्रुस अरेना यांच्या मार्गदर्शनाखाली मेक्सिकोला २-० ने पराभूत केल्यानंतर प्रथमच विश्वचषकाच्या बाद फेरीमध्ये विजय मिळवला आहे. आता अमेरिका ७ जुलै रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ५.३० वाजता राऊंड ऑफ १६मध्ये बेल्जियमचा सामना करेल.

**४ जुलैचे बाद फेरीचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री ३.३० | अर्जेंटिनाविरुद्ध काबो वर्दे |
| सकाळी ०७.०० | कोलंबियाविरुद्ध घाना |
| रात्री १०.३० | कॅनडाविरुद्ध मोरोक्को |

# बेल्जियमचे पिछाडीनंतर ३ गोल

## सेनेगलवर ३-२ ने निसटता विजय

■ सिएटल

**फिफा** विश्वचषकाच्या बाद फेरीत फुटबॉलच्या इतिहासातील सर्वात अविश्वसनीय आणि चित्तथरारक सामन्यांपैकी एक सामना झाला. या स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या बेल्जियमने दोन गोलच्या पिछाडीवरून मुसंडी मारत शेवटच्या काही मिनिटांमध्ये सलग तीन गोल करून सेनेगलला ३-२ ने पराभूत केले. या विजयासह बेल्जियमने उपउपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. सेनेगलने सामन्याच्या सुरुवातीच्या ८० मिनिटांवर पूर्णपणे वर्चस्व गाजवले. हबीब दियाराने २५ व्या मिनिटाला गोल करून सेनेगलला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर दुसऱ्या हाफच्या सहाव्या मिनिटाला (५१व्या मिनिटाला) इस्माईला सारने स्पर्धेतील सर्वोत्तम गोलपैकी एक गोल करून सेनेगलची आघाडी २-०पर्यंत वाढवली. सारने मौसार नियाकाटेच्या लांब पासवर उत्कृष्ट फर्स्ट-टचने नियंत्रण मिळवले आणि बेल्जियमचा दिग्गज गोलकीपर थिबॉ कोर्तुआला चकवून चेंडू गोलजाळ्यात टाकला. त्यानंतर कोर्तुआने काही अप्रतिम बचाव करून बेल्जियमला सामन्यात टिकवून ठेवले. जेव्हा बेल्जियमचे स्पर्धेतून बाहेर पडणे निश्चित वाटत होते, तेव्हा देशाचा सर्वकालीन सर्वाधिक गोल करणारा खेळाडू रोमेलू लुकाकूने ८६ व्या मिनिटाला गोल करून स्कोअर २-१ असा केला. फक्त तीन मिनिटांनंतर ८९ व्या मिनिटाला युरी टिलेमन्सने एक जोरदार गोल करून सामना २-२ असा बरोबरीत आणला आणि सामना अतिरिक्त वेळेत नेला. अतिरिक्त वेळ संपणार होती आणि दोन्ही संघ पेनल्टी शूटआऊटची तयारी करत होते.

मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, न्यायालय - ५,
मुंबई खंडपीठ यांच्या समक्ष
अंतरिम अर्ज क्र.२८२३/२०२५
मध्ये
कंपनी याचिका (आयबी) क्र.३३१ (एमबी) /२०२४

श्री. कैलाश शाह, ... अर्जदार
आयटीसोर्स टेक्नॉलॉजीस लिमिटेडचे रिझोल्यूशन प्रोफेशनल
विरुध्द
श्री. प्रदीप ई. भांगले व इतर ... प्रतिवादी
ऋतु कॉम्प्युटर सर्व्हिसेसच्या प्रकरणात ... कार्यान्वयीन धनको
विरुध्द
आयटीसोर्स टेक्नॉलॉजीस लिमिटेड ...कॉर्पोरेट ऋणको

पुढील सुनावणीच्या तारखेची सूचना
प्रति – खालील प्रतिवादींना, पर्यायी बजावणीद्वारे:
प्रतिवादी क्र. १ : श्री. प्रदीप ई. भांगले
फ्लॅट क्र. १७०३ए आणि १७०३बी, १७ वा मजला, डी-विंग (ईएमपी-४८ म्हणून ज्ञात), इमारत क्र. ६, एव्हरशाईन हॅली कोहीसोलि, एव्हरशाईन्स मिलेनियम पॅराडाईज, फेज ५, ठाकूर व्हिलेज, १२० फूट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई – ४०० १०१, महाराष्ट्र.
प्रतिवादी क्र.२ : श्रीमती प्राची पी. भांगले
फ्लॅट क्र. १७०३ए आणि १७०३बी, १७ वा मजला, डी-विंग (ईएमपी-४८ म्हणून ज्ञात), इमारत क्र. ६, एव्हरशाईन हॅली कोहीसोलि, एव्हरशाईन्स मिलेनियम पॅराडाईज, फेज ५, ठाकूर व्हिलेज, १२० फूट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई – ४०० १०१, महाराष्ट्र.
प्रतिवादी क्र.४ : केस्ट आयटी सर्व्हिसेस
सीजी/२२४, कार्निव्हल हाऊस, ए.के. वैद्य मार्ग जवळ, मालाड (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०० ०९७.
प्रतिवादी क्र.५ : इंटेलिक्स ग्लोबल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
बी-१०१२, कनाकिया वॉल स्ट्रीट, ए.के. रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०० ०९३.

अर्जाची सूचना
नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ मधील कलम ४५, ४६ व ४८ तसेच राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण नियम, २०१६ मधील नियम ११ अन्वये, कमी मूल्याच्या व्यवहारांना अवैध ठरविणे तसेच प्रतिवादींविरुद्ध आवश्यक निर्देश मिळविण्यासाठीचा अर्ज, आयटीसोर्स टेक्नॉलॉजीस लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको) यांचे रिझोल्यूशन प्रोफेशनल श्री. कैलाश शाह यांनी दि. २३ मे, २०२५ रोजी सादर केला असून, सदर अर्जाची सुनावणी दि.२७ जुलै, २०२६ रोजी मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, न्यायालय – ५ समक्ष निश्चित करण्यात आलेली आहे.
ही जाहिरात माननीय न्यायाधिकरणाच्या १९.०१.२०२६ रोजीच्या आदेशातील निर्देशानुसार प्रकाशित करण्यात आली आहे, या आदेशाद्वारे प्रतिवादी क्र.१, २, ४ आणि ५ यांना पर्यायी सेवा पद्धतीने सूचना बजावण्याची परवानगी देण्यात आली आहे.
सदर अर्जास समर्थन अथवा विरोध करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, स्वतःच्या किंवा आपल्या वकिलाच्या स्वाक्षरीसह, आपले नाव व पत्ता नमूद करून, अर्जाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या किमान दोन दिवस आधी अर्जदाराच्या वकिलाकडे आपल्या हेतूची लेखी सूचना पोहोचेल अशा रीतीने पाठवावी. जर संबंधित व्यक्तीस सदर अर्जास विरोध करावयाचा असेल, तर अशा नोटीसीसोबत विरोधाची कारणे नमूद करावीत किंवा त्या अनुषंगाने केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत जोडावी. सदर अर्जाची प्रत आवश्यक असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्यासाठी विहित शुल्क भरल्यानंतर, खाली सही करणाऱ्याकडून उपलब्ध करून देण्यात येईल.
ठिकाण: सुरत सही/-
दिनांक: ०३.०७.२०२६ श्री. कैलाश शाह
आयटीसोर्स टेक्नॉलॉजीस लिमिटेडचे रिझोल्यूशन प्रोफेशनल
आयबीबीआय नोंद.क्र. IBBI/IPA-001/IP-P00267/2017-18/10511

सिडको
शहरांचे शिल्पकार

बोली मागविणारी सूचना
उलवे नोड, नवी मुंबई येथे सेक्टर - १२, १३, १५, १६, १७ आणि १८ मध्ये प. ज. वाहिन्या, पदपथ इ.च्या ०३ वर्षांकरिता सर्वसमावेशक दुरुस्त्या आणि देखभाल

महाराष्ट्राची सिडको मर्यादीत खाली नमूद केलेल्या कामाकरिता अनिवार्य पात्रता निकष पूर्ण करीत असलेल्या, सिडको लि. किंवा केंद्र सरकार किंवा महाराष्ट्र राज्य आणि त्यांच्या उपक्रमांकडे उचित वर्ग आणि श्रेणीमध्ये नोंदणीकृत असलेल्या आणि ज्यांनी **एकात्मिक पायाभूत सुविधा कामांचा विकास, पर्जन्य जल वाहिनी आणि पदपथाचे बांधकाम / दुरुस्ती आणि देखभाल** यांसारखी तत्सम स्वरुपाची कामे पूर्ण केलेल्या अनुभवी संभाव्य बोलीदारांकडून ई-निविदा प्रक्रियेद्वारे **"ऑनलाईन" बाब दर शतमान बोली** मागवित आहेतः
**१) कामाचे नाव : उलवे नोड, नवी मुंबई येथे सेक्टर - १२, १३, १५, १६, १७ आणि १८ मध्ये प. ज. वाहिन्या, पदपथ इ.च्या ०३ वर्षांकरिता सर्वसमावेशक दुरुस्त्या आणि देखभाल, २) सी. ए. क्र.:** ०६/ सिडको/ ईई(उलवे-II)/ २०२६-२७. **३) बोलीवर लावलेली किंमत:** ₹ ८२,४६,४९४.७७ (जीएसटी वगळता), **४) इ.र.अ.:** ₹ ८३,०००/- , **५) नोंदणीकरण वर्ग:** वर्ग - IV (ए) आणि त्यावरील (नागरी), **६) पूर्तता कालावधी :** १०९५ (एक हजार पंचाण्णव) दिवस (पावसाळा समाविष्ट), **७) निविदा प्रक्रिया शुल्क :** ₹५,९००.०० (१८% जीएसटी समाविष्ट (ना-परतावा)).
बोली कार्यक्रमासह बोली प्रपत्र वेबसाईट **https://mahatenders.gov.in** वर दि. ०३.०७.२०२६ रोजी सायं. १७.०१ वाजता उपलब्ध होतील.

अधीक्षक अभियंता
(डी ॲण्ड यू)
CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१३०/२०२६-२७

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६
• उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) खालील सूचना
• बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनियम ३३ मध्ये नवीन उपखंड २८ समाविष्ट करण्यास प्रस्तावित फ़ेरबदलाबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई : ४०० ०२१,
दिनांक :- १०/०६/२०२६

सूचना

क्र. टिपीबी- ४३२६/प्र.क्र.६२/२०२६/नवि-११

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करणेत आलेला आहे.) च्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका त्यांचे अधिकार क्षेत्राकरीता (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त महानगरपालिका असा करणेत आलेला आहे.) नियोजन प्राधिकरण आहे;
आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने अधिसूचना क्र. टिपीबी- ४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि. ८/०५/२०१८ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिसूचना असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारूप विकास योजना- २०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०३४ (यापुढे याचा उल्लेख उक्त नियमावली असा करणेत आलेला आहे) ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट- ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अ मध्ये दशविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे. आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस सम क्रमांकाचे शुध्दीपत्रक दि. २२ जून २०१८ रोजी निर्गमित केले आहे; आणि ज्याअर्थी, त्यानंतर उक्त अधिसूचनेस शासनाने समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले असून सदर शुध्दीपत्रक व पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे; आणि ज्याअर्थी, उक्त नियमावली दि.१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे; आणि ज्याअर्थी, शासनाने दि. २१/०९/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे उक्त नियमावलीमधील सारभूत स्वरुपाचे बदल ईपी-१ ते ईपी-१६८ ला ( ठराविक ईपी व निर्णयार्थ प्रलंबित ठेवलेल्या ठराविक तरतुदी वगळून) मंजूरी प्रदान केली आहे; आणि ज्याअर्थी, उक्त मंजूरीच्या अधिसूचनेत आणि मंजूर तरतूदींमध्ये टंकलेखनाच्या त्रुटी व चुका तसेच उक्त नियमावलीमधील काही तरतूदींच्या अर्थबोधाची स्पष्टता करुन सुसंगती आणणे या करिता शासनाने दि.१२/११/२०१८ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित केले आहे;
आणि ज्याअर्थी, जरी उक्त नियमावलींतर्गत पुनर्विकासाचे विविध पर्याय उपलब्ध असले, तरी समाजातील सामाजिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांच्या गृहनिर्माणासाठी समर्पित आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य अशा स्वतंत्र तरतुदीची आवश्यकता आहे; आणि ज्याअर्थी, सामाजिकदृष्ट्या दुर्बल आणि/किंवा वंचित घटकांसाठी 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक' (EWS) गृहनिर्माण उभारणीकरिता, उक्त महानगरपालिका, सार्वजनिक प्राधिकरणे आणि शासनाच्या जमिनींवर, बृहन्मुंबईच्या कार्यक्षेत्रात हक्काचा गृहनिर्माण साठा उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राधान्य आहे.
आणि ज्याअर्थी, वरील बाबींचा विचार करता, उक्त महानगरपालिकेच्या हद्दीत परवडणाऱ्या घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी आणि गृहनिर्माण साठा वाढवण्यासाठी, विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि इतर अधिसूचित विशेष दुर्बल आणि / किंवा सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या प्रवर्गांसाठी गती देण्याच्या उद्देशाने, उक्त नियमावलीमधील विनियम ३३ मध्ये नवीन उपखंड २८ समाविष्ट करणेबाबत सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये(यापुढे याचा उल्लेख प्रस्तावित फेरबदल असा करणेत आलेला आहे) दर्शविल्यानुसार फ़ेरबदल करणे सार्वजनिक हिताचे दृष्टीने आवश्यक आहे, असे शासन नगर विकास विभागाचे मत झाले आहे.
आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन, शासन याद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (१कक) चे खंड (क) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिध्द करीत आहे. शासनाकडून असेही कळविणेत येत आहे की, खालील परिशिष्टात नमूद प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती/ सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१ या कार्यालयाचे पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदर प्राप्त हरकती / सूचनांवर सुनावणी देवून तसेच लागू असेल त्याप्रमाणे उक्त महानगरपालिकेचे म्हणणे घेवून त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना शासनाचे वतीने अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्याकडे सदरच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये कार्यवाही करण्यात येईल;
उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदा / नियम) या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करण्यात यावी.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
( अमर पाटील )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट
शासन नगर विकास विभाग सूचना क्र. टिपीबी- ४३२६ / प्र.क्र.६२ / २०२६ / नवि-११,
दिनांक- १० जून, २०२६ सोबतचे परिशिष्ट

**New sub regulation (28) is proposed to be added in Regulation (33) of Development Control and Promotion Regulations-2034 as follows:-**
**33(28):- Special Housing -Development of identified plots of BMC/Govt./Public Authorities for construction of EWS Housing for special weaker and/or socially disadvantaged categories notified by Government for the purpose of this section.**

1. The Housing scheme shall be notified by Govt. alongwith scheme parameters.
2. Net area of plot after deducting road setback/D.P. Roads shall be minimum 10,000 sq.m.
3. The development shall be allowed on vacant and unreserved/non-designated lands free from any encumbrances.
4. The plot shall be accessible by min 18.00 m wide road. The development can be allowed on abutting Road having 18.00 m Road widening, however minimum 12.00 m road width shall be available on site upto nearest Road junction of road with 18m or more.
5. The development can be undertaken by BMC/Govt. / Public Authority by the entity whom the plot is allotted by BMC/Govt./Public Authorities or the developer appointed by the Entity whom plot is allotted or the developer appointed by BMC/Govt./Public Authority.
6. The size of tenement of EWS housing shall be 27.88 sqm Carpet area. This shall be treated as rehabilitation area. For this purpose, rehabilitation carpet area shall be considered within a tenement excluding that covered by the walls/columns and any other areas specifically exempted from floor space index.
7. All the allottees shall be registered in Unified Citizen Database for Housing (UCDH) and his family shall not be beneficiary of any other subsidised housing schemes.
8. The total permissible FSI of the scheme shall be minimum as mentioned in Table No.12 of Regulation 30 -. However higher FSI may be permitted by Municipal Commissioner after giving due consideration to Impact Assessment study regarding the impact on city and the sector level infrastructure and amenities as well as traffic and environment of the implementation of the scheme, provided that higher FSI shall be used for the purpose of only creation of further housing for special category and corresponding incentive and incidental amenities and for no other purpose.
9. The incentive built up area against construction of EWS tenement shall be as per table below:

| Basic Ratio (LR/RC) | Incentive FSI (Percentage) |
|---|---|
| Above 6 | 72 |
| Above 4 and upto 6 | 81 |
| Above 2 and upto 4 | 89 |
| Upto 2 | 98 |

**Explanation:**
RC is rate of construction in respect of RCC Construction and Land Rate (LR) is the rate of Open Land for FSI 1. (No actual cost of construction will be considered) Provided further that in case there is more than one land rate applicable to different parts of the plot under the scheme, a weighted average of all the applicable rates shall be taken for calculating the Average Land Rate and the Basic ratio. Provided further that for calculation of the Basic Ratio, the Land Rate (LR) and the Rate of Construction (RC) shall be taken for the year in which IOD is issued and the said ratio shall remain unchanged even if such Scheme undergoes any revision or modification subsequently during its course of completion.
10. 100% of the incentive FSI can be used for residential or non-residential purpose in consonance with DCPR provisions.
11. Fungible compensatory Area shall not be allowed for EWS Housing tenements. However, fungible compensatory Area shall be permissible for incentive / sale built up area on payment of premium as per the provisions of DCPR.
12. 5% of total permissible FSI shall be utilized for construction of convenience Shopping/ Amenity which shall be built by the developer / entity and handed over to the society of EWS Housing. The society shall not sell this outright but give it on lease only, and such lease premium shall contribute towards maintenance of the building. The developer/entity is entitled to incentive built up area as mentioned in sub regulation 9 above.
13. Provision of Inclusive Housing as per Regn.15 shall not be insisted.
14. The appurtenant land of EWS Housing component and sale component shall be in the ratio of 45:55.
15. The construction of EWS Housing component and sale component shall be done in the 2:1 proportion. However, Occupation Certificate to sale component shall be granted only after handing over of EWS Housing component duly completed.
16. Notwithstanding anything contained in these regulations:
a) The relaxations incorporated in Sub-Regulation No. 6 of Regulation No. 33(10) of these regulations except clauses 6.11, 6.16 and 6.18 shall be applicable for EWS Housing component only.
b) Even if the Layout open space is reduced to make the project viable, a minimum of 15% LoS shall be maintained.
17. Additional Development Cess.
Additional development cess equivalent to 100% of Development charges on BUA (excluding the fungible compensatory area/BUA), shall be paid by the project proponent. This amount shall be paid to the Corporation in accordance with the time schedule for such payment as may be laid down by the Commissioner, provided the payment of instalments shall not go beyond the completion of construction. This amount shall be used for Scheme to be prepared for the improvement of off-site infrastructure in the area around the development. Development cess shall be in addition to development charges levied as per section 124 of MR & TP Act 1966.
18. The distance between any two EWS Housing buildings shall be minimum 9.00 m.

सही/-
(अमर पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

क्रमांक: आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी १४४०

मुंबई | शुक्रवार
३ जुलै, २०२६

नवाकाळ

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## तापसीला साकारायचीय वंडरवूमन



**बॉलिवूडमधील** आपल्या दमदार अभिनयासाठी ओळखली जाणारी अभिनेत्री तापसी पन्नू हिने पडद्यावर वंडर वूमन बनण्याची इच्छा व्यक्त केली आहे. चित्रपटसृष्टीत वेगवेगळ्या धाटणीच्या आणि आव्हानात्मक भूमिका साकारल्यानंतर, आता तिला एका मोठ्या सुपरनायिकेच्या भूमिकेत स्वतःला आजमावून पाहायचे आहे. तापसीने सांगितले की, लहानपणापासूनच तिला कॉमिक्स आणि सुपरहिरोच्या पात्रांचे प्रचंड आकर्षण राहिले आहे. हॉलिवूडमध्ये ज्याप्रमाणे महिला सुपरहिरोवर आधारित चित्रपट बनवले जातात, त्याच धर्तीवर भारतातही एका ताकदवान आणि भारतीय संस्कृतीशी जोडलेल्या महिला सुपरहिरोची कथा मोठ्या पडद्यावर यायला हवी, असे तिला वाटते. अशा प्रकारची भूमिका साकारायला मिळणे हे तिच्यासाठी एक स्वप्न पूर्ण झाल्यासारखे असेल. आपल्या कारकिर्दीत अनेक महिलाप्रधान आणि थरारक चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या तापसीला ॲक्शन जॉनरमध्ये विशेष रस आहे. जर एखाद्या दिग्दर्शकाने किंवा लेखकाने भारतीय महिला सुपरहिरोची संकल्पना तिच्याकडे आणली, तर ती अशा प्रकल्पाचा भाग होण्यासाठी अत्यंत उत्सुक असेल, अशी भावना तिने बोलून दाखवली आहे. आता तापसीची ही इच्छा बॉलिवूडमधील एखादा मोठा निर्माता किंवा दिग्दर्शक पूर्ण करणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

## सलमानला दिलासा नाहीच



**'काला हिरण** : द बॅटल फॉर लेगसी' या चित्रपटाच्या प्रदर्शनावरून सुरू असलेला कायदेशीर वाद आता अधिक तीव्र झाला आहे. अभिनेता सलमान खानने या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्याची मागणी करत दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी ६ जुलै २०२६ पर्यंत पुढे ढकलली असून, चित्रपटाला कोणताही अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला आहे. न्यायालयाच्या या निर्णयानंतर चित्रपटाचे निर्माते अमित जानी यांनी सोशल मीडियावर आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे.

सलमानने आपल्या याचिकेत असा आरोप केला आहे की, हा चित्रपट त्याच्या 'पर्सनॅलिटी राईट्सचे उल्लंघन करणारा आहे. चित्रपटाच्या प्रमोशनल मटेरियलमध्ये हुबेहूब त्याच्यासारखा दिसणारा अभिनेता दाखवण्यात आला असून, त्याच्या हातातील प्रसिद्ध निळे ब्रेसलेट, १९९८ मधील काळवीट शिकार प्रकरण आणि गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईसोबतच्या कथित वादाचे थेट संदर्भ देण्यात आले आहेत. याला सलमानने तीव्र विरोध केला आहे. हा चित्रपट जगभरातील ८ हजार चित्रपटगृहांमध्ये एकाच वेळी प्रदर्शित होईल.

## 'धुरंधर' झळकणार जपानमध्ये



**रणवीर** सिंग मुख्य भूमिकेत असलेला 'धुरंधर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर तुफान यशाची कमाई केल्यानंतर आता जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवण्यासाठी सज्ज झाला आहे. हा हेरगिरीवर आधारित थरारपट (स्पाय ॲक्शन थ्रिलर) १० जुलै २०२६ रोजी जपानमधील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चित्रपटाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने हे एक मोठे पाऊल मानले जात आहे.

चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी रणवीर सिंगने जपानमधील प्रेक्षकांसाठी एक विशेष व्हिडिओ संदेश जारी केला आहे. यामध्ये त्याने जपानी चाहत्यांना हा भव्य चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहण्याचे आवाहन केले आहे.

## 'अदल बदल' मधून शाहिदची एक्झिट



**राष्ट्रीय** पुरस्कार विजेते दिग्दर्शक अमित रवींद्रनाथ शर्मा यांच्या आगामी 'अदल बदल' या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून सिनेसृष्टीत आणि प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता होती. विशेषतः या चित्रपटात अभिनेता शाहिद कपूर आणि अभिनेत्री जान्हवी कपूर ही फ्रेश जोडी पहिल्यांदाच मुख्य भूमिकेत एकत्र दिसणार असल्याच्या बातम्या गेल्या काही दिवसांपासून सातत्याने येत होत्या. परंतु, आता शाहिद कपूर या चित्रपटाचा भाग नसल्याचे समोर आले आहे. चित्रपट वर्तुळातील अतिशय विश्वसनीय सूत्रांच्या हवाल्याने 'फिल्मफेअर' या मासिकाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, शाहिद कपूरने अमित शर्मा यांच्या या चित्रपटातून अधिकृतपणे काढता पाय घेतला आहे.

सुरुवातीला या चित्रपटासाठी शाहिदच्या नावाची जोरदार चर्चा होती आणि प्राथमिक पातळीवर बोलणीही झाली होती. मात्र, अंतिम टप्प्यात काही धोरणात्मक कारणांमुळे हा करार पूर्ण होऊ शकला नाही.

यापूर्वीच्या काही अहवालांमध्ये शाहिदने या चित्रपटासाठी १८ कोटी रुपयांचे मानधन निश्चित केल्याचा दावा करण्यात आला होता.

परंतु ताज्या घडामोडींनुसार मानधनाचा आकडा, बजेटच्या मर्यादा किंवा तारखांचा ताळमेळ यापैकी कोणत्या तरी कारणावरून अंतिम सहमती होऊ शकलेली नाही असे दिसते.

## कंगना भडकली राम कपूरवर



**'लॉक अप** : सच या सझा' या रिॲलिटी शोच्या दुसऱ्या पर्वामध्ये एक मोठा हाय-व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला आहे. या शोच्या पहिल्या पर्वाची सूत्रसंचालक राहिलेली अभिनेत्री कंगना रणौत हिने नुकतीच एका विशेष भागामध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिने घरातील स्पर्धक आणि प्रसिद्ध अभिनेता राम कपूर याच्या खेळण्यातील दृष्टिकोन आणि वागणुकीवरून त्याला कडक शब्दांत सुनावले. कंगनाने राम कपूरला थेट विचारले की, जर त्याला हा खेळ आणि जेल आपल्या लायकीची वाटत नसेल, तर तो इथे आलाच कशासाठी? कंगना म्हणाली, रामजी, तुम्ही या खेळाला गांभीर्याने घ्यायला हवे होते. आणि जर तुम्हाला असे वाटत असेल की, तुम्ही या जेलपेक्षा खूप मोठे आहात, तर मग इथे आलात कशाला? तुमचा मूर्खपणा दाखवायला? कंगनाच्या या थेट विधानावर राम कपूरने स्वतःची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. पण कंगनाने त्याला स्वतःचा बचाव न करण्याचा सल्ला देत म्हटले की, जर स्वतःमध्ये सुधारणा करायची असेल, तर स्वतःचे समर्थन करणे बंद करा.

विशेष म्हणजे, कंगनापूर्वी या शोची सध्याची सूत्रसंचालक फराह खान हिनेही राम कपूरच्या घरातील भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला होता. यामुळे 'लॉक अप २' मधील त्याची पुढील वाटचाल कशी असेल, याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.



## अंबरनाथमध्ये महावितरणने १०४ ग्राहकांच्या तक्रारी सोडवल्या

कल्याण

**वीज** ग्राहकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महावितरण-कडून अंबरनाथमध्ये तक्रार निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम परिसरातील १०४ वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात आले. या शिबिरात प्रामुख्याने वीज देयक, जुन्या वीज वाहिन्या बदलणे, नादुरुस्त मीटर आदी तक्रारींचा समावेश होता. यावेळी उपस्थित वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर संदर्भात माहिती देण्यात आली तसेच त्यांच्या मनातील विविध शंकाचे निरसन करण्यात आले. अधीक्षक अभियंता विजय फुंदे, कार्यकारी अभियंता राजेंद्र भांबर यांच्या मार्गदर्शनाखाली अतीरिक्त कार्यकारी अभियंता अलका कावळे, यादव इंगळे यांनी वरील शिबीर आयोजित केले होते.

## माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मुंबई महापालिकेत ११६ अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून रक्तदान

मुंबई



**केसूला** बंजारा सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक साहेब यांच्या ११३ वी जयंतीनिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे ११६ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून कर्तव्य बजावले.

शिबीर प्रसंगी स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस महापौर रितू तावडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, आमदार राजेश राठोड, पालिका उपआयुक्त (सुधार) संजोग कबरे, उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर, डॉ. पृथ्वीराज चव्हाण सहाय्यक आयुक्त, प्रमुख कामगार अधिकारी सुनील जांगळे, संस्थापक अध्यक्ष धर्मा कन्हीराम राठोड, राजू नाईक, संचालक विजय जाधव, संचालक इंदल राठोड, विभागीय कामगार अधिकारी दिलीप राठोड, तसेच केसूला बंजारा सामाजिक सेवा संस्थेचे सचिव विशाल राठोड, उपाअध्यक्ष डॉ. व्यंकटेश राठोड, खजिनदार अविनाश राठोड, कार्याध्यक्ष रमेशकुमार आडे, जितेंद्र राठोड, निलय पवार, आत्माराम चव्हाण, युवराज चव्हाण, रामधन चव्हाण, कर्मचारी व कामगार बंधू भगिनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एआय, संरक्षण, ऊर्जा, खनिज क्षेत्रात भारत-जपानचे सहकार्य अधिक दृढ

नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी आणि जपानच्या पंतप्रधान साने ताकाइची यांच्या उपस्थितीत झालेल्या १६व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), संरक्षण, ऊर्जा, आर्थिक सुरक्षा, महत्त्वाची खनिजे, आरोग्य आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य वाढविण्यासाठी अनेक महत्त्वाच्या करारांवर आज स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

दोन्ही देशांनी एआय, सेमीकंडक्टर, क्वांटम तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढविण्याचा निर्णय घेतला. 'युनिकॉर्न' नेव्हल रेडिओ अँटेना विकसित करण्याच्या पहिल्या संयुक्त संरक्षण प्रकल्पालाही मंजुरी देण्यात आली. तसेच भारतात पुढील दशकात १० ट्रिलियन येनची जपानी गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. ऊर्जा सुरक्षेसाठी भारत-जपान बायोगॅस उपक्रमाअंतर्गत देशभरात १,००० बायोगॅस आणि सेंद्रिय खतनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. शिखर परिषदेत मुक्त, समृद्ध आणि नियमाधारित इंडो-पॅसिफिकसाठी दोन्ही देशांनी संयुक्तपणे काम करण्याचीही ग्वाही दिली. भारत दौऱ्यावर प्रथमच आलेल्या पंतप्रधान साने ताकाइची यांचे स्वागत करताना नरेंद्र मोदी यांनी भारत-जपान संबंधांचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा स्पष्ट केला.

## चेंबूरच्या विद्यार्थी मृत्यू प्रकरणी पालिकेचे तीन अधिकारी निलंबित

### चौकशी समिती गठीत

मुंबई

**चेंबूरमधील** सेंट अँथनी हायस्कूल जवळील ११ वा रस्ता येथे शाळेच्या बसवर पिंपळाचे झाड मुळासकट उन्मळून पडल्याने एका ११ वर्षीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. आता या दुर्घटनेत प्रथमदर्शनी ज्यांच्याकडून निष्काळजीपणा दिसून आला अशा तीन पालिका अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये पालिकेच्या 'एम'पश्चिम कार्यालयातील उद्यान विभागाचे सहाय्यक अधीक्षक जगदीश भोईर, रस्ते विभागाचे दुय्यम अभियंता अरुण मुंढे आणि योगेश पार्टे यांचा समावेश असून, आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या अपघाताची सखोल चौकशी करण्यासाठी पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी चौकशी समिती गठित करण्याचे निर्देश दिले आहेत. या समितीत उप आयुक्त (विशेष अभियांत्रिकी) पुरुषोत्तम माळवदे, उप आयुक्त (अभियांत्रिकी) शशांक भोरे यांचा समावेश आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी आठ दिवसांचा वेळ देण्यात आला आहे. निलंबित अभियंत्यांच्या समर्थनार्थ मुंबई महापालिका अभियंता संघटनेने महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना पत्र पाठवून निलंबनाचा निर्णय मागे घेण्याची मागणी केली आहे. संघटनेच्या मते, ही घटना मुसळधार पावसामुळे घडलेली दुर्दैवी दुर्घटना असून ती नैसर्गिक आपत्तीच्या स्वरूपातील आहे.घटनेची चौकशी पूर्ण होण्यापूर्वीच अभियंत्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली, ही बाब अन्यायकारक असल्याचा दावा संघटनेने केला आहे.या प्रकरणात प्रथमदर्शनी निष्काळजीपणा झाल्याचे निदर्शनास आले असून संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे.संबंधित कंत्राटदाराविरोधातही कठोर कारवाई होणार आहे.पुन्हाअशी घटना घडू नये यासाठी पालिका आयुक्तांनी धोकादायक झाडांची नव्याने छाटणी आणि कालबद्ध पुनर्परीक्षण करण्याचे आदेश दिले आहेत.

## डहाणूमध्ये पोलीस बंदोबस्तात खारफुटी झाडांची कत्तल सुरू

पालघर

**डहाणू** तालुक्यातील वरोर येथे वाढवण बंदराला जोडणाऱ्या प्रस्तावित ग्रीनफील्ड महामार्गासाठी खारफुटीची झाडे तोडण्याची कारवाई कडक पोलीस बंदोबस्तात सुरू करण्यात आली. यावेळी स्थानिकांनी व 'वाढवण बंदर संघर्ष समितीने' याला सरकारविरोधी घोषणा देत तीव्र विरोध केला. मात्र पोलिसांनी हा विरोध मोडून काढत २० आंदोलकांना अटक केली.

वाढवण बंदराला राष्ट्रीय महामार्गाशी जोडणाऱ्या रस्त्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने २०८ खारफुटीची झाडे तोडण्यास मंजुरी दिली होती. स्थानिकांचा वाढवण बंदराला व पर्यावरणाच्या नासाडीला सुरुवातीपासूनच विरोध आहे. खारफुटी तोडताना इतर बेकायदेशीर झाडेही तोडली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. त्यामुळे ही खारफुटी झाडांची कत्तल सुरू असताना ग्रामस्थ रस्त्यावर उतरले होते, पण पोलीस आणि प्रशासनाने हा विरोध धुडकावून लावत आंदोलकांना ताब्यात घेतले.या कारवाईमुळे परिसरातील वाढवण बंदर आणि पर्यावरणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## अंत्यसंस्काराच्या जेवणात मालपुआ न दिल्याने ४३ कुटुंबांवर बहिष्कार

जयपूर

**राजस्थानच्या** सिरोही जिल्ह्यातील एका गावात अंत्यसंस्काराच्या जेवणात पारंपरिक 'मालपुआ' न दिल्याच्या कारणावरून ४० हून अधिक कुटुंबांवर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला आहे.

मंडवारीया गावात घडलेल्या या प्रकारात, आर्थिक अडचणींमुळे एका कुटुंबाने अंत्यसंस्कारावेळी साधे जेवण दिले होते. मात्र पारंपरिक गोड पदार्थ 'मालपुआ' न दिल्याने गावातील काही ज्येष्ठ संतप्त झाले. १८ जून रोजी संबंधित कुटुंबासह त्यांना पाठिंबा देणाऱ्या ४२ कुटुंबांवर बहिष्कार टाकल्याचा आरोप आहे. या बहिष्कारामुळे बाधित कुटुंबांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गावातील दुकानदारांकडून रेशन देण्यास नकार दिला जात आहे, विहिरीतून पाणी घेण्यास मनाई केली जात आहे. तसेच मजुरीचे कामही नाकारले जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## पनवेलमधून अवयवदान, आरोग्य सेवा दिंडीचे प्रस्थान

पनवेल

**आषाढी** वारी पालखी सोहळ्या निमित्त पनवेल महानगरपालिका आणि धन्वंतरीज ऑर्गनायझेशन फॉर सोशियो-हेल्थ ट्रान्सफॉर्मेशन (दोस्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अवयवदान व आरोग्य सेवा दिंडीचा प्रस्थान सोहळा व दोस्त दिंडी पुरस्कार सोहळा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे उत्साहात संपन्न झाला.

या सोहळ्यावेळी पनवेल महानगरपालिका महापौर नितीन पाटील, मानव ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईचे अध्यक्ष के. सी. लुथिया, महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा विभागाचे माजी महासंचालक, डॉ. सुभाष साळुंखे, मसिना रुग्णालय विश्वस्त व्हॅस्कुलर सर्जन डॉ. गुस्ताद डावर, वैष्णव चॅरिटेबल ट्रस्ट कुर्लाचे अध्यक्ष विजय कासुर्डे यांचा दिंडी पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

## आपापसातच ऑपरेशन कमळ होणार संजय राऊतांचा भाजपावर घणाघात



मुंबई

**आज** इतर पक्षांमध्ये फोडाफोडीचे राजकारण करणाऱ्यांना भविष्यात त्याच परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो. ऑपरेशन टायगर, ऑपरेशन तुतारीनंतर एक दिवस 'ऑपरेशन कमळ'ही होईल आणि तेही आपापसातच होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा एकमेकांना फोडण्याचे काम करतील, अशी टीका उबाठा खासदार संजय राऊत यांनी केली.

संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्रातील राजकारणाला एक प्रतिष्ठा आणि विचारांची परंपरा होती. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, बाळासाहेब ठाकरे, लिमये, फर्नांडिस यांसारखे नेते देशाच्या हितासाठी एकत्र विचार करायचे. मात्र, आता ती परंपरा संपल्यासारखी दिसते. आज सत्ताधाऱ्यांचे पक्ष फोडणे हे एकच काम उरले आहे. मात्र, कधी त्यांच्यावरच 'ऑपरेशन' होईल, हे सांगता येत नाही. यांचा डीएनए तपासावा लागेल. यांच्यात महाराष्ट्राचे रक्त आहे की भेसळ, हे पाहावे लागेल. ऑपरेशन टायगर म्हणू नका, हे लोक वाघ नाहीत, तर कोल्हे आणि लांडगे आहेत.

राज ठाकरे यांनी फुटलेल्या खासदारांवर केलेल्या टीकेचे समर्थन करत राऊत म्हणाले की, माल विकायला तयार असेल तर कोणी तरी तो घेणारच. सचिन अहिर आमच्यासोबत राहूनही फडणवीस आणि शिंदे यांच्यासाठी काम करत होते. आमचे खासदार फोडण्यात त्यांचा हात होता, म्हणूनच त्यांना उपसभापतीपदाचे बक्षीस देण्यात आले. भाजपने देशाचे राजकारण खालच्या पातळीवर नेले आहे. भविष्यात असे म्हणावे लागेल की या देशात कधीतरी लोकशाही होती. महायुतीत धर्मद्रोही आणि रामद्रोही लोकांचा समावेश आहे.

## स्कूटरवर नारळाचे झाड कोसळून तरुण जखमी

भाईंदर

**मुसळधार** पावसामुळे झाडे कोसळण्याच्या घटना सुरूच असून, भाईंदरमध्ये नारळाचे झाड कोसळून ३५ वर्षीय दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. बुधवारी संध्याकाळी भाईंदर पश्चिमेच्या राई गावात ही दुर्घटना घडली. जखमी पाटील याच्यावर रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

राहुल पाटील पेट्रोल पंपावर इंधन भरून घरी परतत असताना त्याच्या स्कूटरवर नारळाचे झाड मानेवर कोसळले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती देत त्याला रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या मणक्याला गंभीर दुखापत झाली आहे. राहुल पाटील हे 'राई गाव भूमिपुत्र शिलोत्री संघाचे' अध्यक्ष अशोक पाटील यांचे पुत्र आहेत.

# नवा काळ

• मुंबई | शुक्रवार ३ जुलै, २०२६ • पान -८


# १२ हजारांहून अधिक मध्यम उद्योग बंद झाल्याची उद्योगमंत्र्यांची कबुली



**मुंबई** - राज्यातील गेल्या चार वर्षांत १२ हजारांहून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग बंद झाल्याच्या वृत्तांमध्ये काही अंशी तथ्य असल्याची कबुली उद्योगमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी विधानसभेत दिली. मात्र, प्रभावित उद्योग पुन्हा सुरू करण्यासाठी राज्य सरकारने विविध उपाययोजना सुरू केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सामंत यांनी सांगितले की, कोविड-१९ महामारी, उत्पादन खर्चात झालेली वाढ आणि पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक व्यापार व पुरवठा साखळीवर परिणाम झाला. त्यामुळे एमएसएमई क्षेत्राला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. डिसेंबर २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या औद्योगिक धोरणांतर्गत, अडचणीत आलेल्या एमएसएमई उद्योगांना पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक मदत दिली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

## कोयनेच्या कुशीत गणेश मूर्ती

**स्थानिकांच्या** निदर्शनास आलेली ही गणेशमूर्ती पारंपरिक दगडी शिल्पांपेक्षा वेगळी असून, तिची रचना आणि धातुकलेची शैली प्राचीन ढोकरा (Dhokra) धातुकलेशी साधर्म्य दर्शवत असल्याचे प्राथमिक निरीक्षण आहे. ऋषीमुद्रेसदृश बैठी आसनरचना, सूक्ष्म अलंकार, आदिम शैलीतील शिल्पांकन आणि कलात्मक बांधणी यामुळे ही मूर्ती विशेष ठरत आहे.

**पावसाअभावी कोयना नदीचे पात्र कोरडे पडत असताना सह्याद्रीच्या कुशीत एक अनपेक्षित ऐतिहासिक ठेवा समोर आला आहे. बामणोली-तापोळा परिसरातील कोयना नदीच्या भेगाळलेल्या पात्रात दुर्मीळ शैलीतील गणेशमूर्ती आढळून आल्याने इतिहास संशोधक, पुरातत्त्व अभ्यासक आणि कलारसिकांचे लक्ष या शोधाकडे वेधले गेले आहे.**





ढोकरा कला ही भारतातील सर्वात प्राचीन धातू ओतकाम परंपरांपैकी एक मानली जाते. पश्चिम बंगाल, ओडिशा, झारखंड, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशातील आदिवासी समाजाने ही कला शतकानुशतके जपली आहे. त्यामुळे अशी शैली सह्याद्रीतील कृष्णा-कोयना खोऱ्यात आढळल्याने अभ्यासकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे.

यंदा पावसाने उशिरा हजेरी लावल्याने नदीची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात घटली असून, अनेक ठिकाणी नदीपात्र उघडे पडले आहे. याच परिस्थितीमुळे ही मूर्ती प्रथमच नजरेस आल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. अन्यथा ती अनेक वर्षे गाळाखाली दडलेली असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मूर्तीचा कालखंड, ती कोणत्या धातूपासून तयार करण्यात आली आहे, तिचा उगम स्थानिक आहे की बाहेरील ढोकरा परंपरेशी संबंधित आहे, याचा उलगडा पुरातत्त्व विभाग आणि मूर्तिशास्त्र तज्ज्ञांच्या सखोल अभ्यासानंतरच होऊ शकणार आहे. अभ्यासकांच्या मते, या मूर्तीचे वैज्ञानिक परीक्षण झाल्यास कृष्णा-कोयना खोऱ्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाविषयी महत्त्वाची माहिती समोर येऊ शकते.

या अनोख्या शोधामुळे बामणोली-तापोळा परिसर पुन्हा एकदा चर्चेत आला असून, सह्याद्रीच्या कुशीत अजूनही अनेक ऐतिहासिक रहस्ये दडलेली असावीत, अशी चर्चा सुरू झाली आहे.

## वांद्रे रिक्लेमेशन, वरळीतील समूह पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

**याचिका हायकोर्टाने फेटाळल्या**

■ मुंबई

**शहरातील** वांद्रे रिक्लेमेशन आणि वरळी येथील आदर्श नगर म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाचा मार्ग आज उच्च न्यायालयाने मोकळा केला. दोन मोठ्या वसाहतींच्या पुनर्विकासाला आणि बांधकाम व विकास एजन्सीच्या नियुक्तीसाठीच्या निविदा प्रक्रियेला न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या याचिका न्या. मकरंद कर्णिक व न्या. श्रीराम मोडक यांच्या खंडपीठाने फेटाळल्या. या निर्णयामुळे ५० ते ६० वर्षे जुन्या व मोडकळीस आलेल्या ५ हजारांहून अधिक घरांच्या पुनर्विकासाला गती मिळणार आहे.

स्थानिक सहकारी गृहनिर्माण संस्थांनी सरकारच्या 'समूह पुनर्विकास' धोरणाला आणि निविदा प्रक्रियेला न्यायालयात आव्हान दिले होते. रहिवाशांच्या संमतीचा अधिकार आणि स्व-पुनर्विकासाचे पर्याय हिरावून घेतले जात असल्याचा युक्तिवाद गृहनिर्माण संस्थांमार्फत करण्यात आला होता. न्या. मकरंद कर्णिक व न्या. श्रीराम मोडक यांच्या खंडपीठाने हा युक्तिवाद अमान्य केला. आम्हाला या रिट याचिकांमध्ये कोणतेही तथ्य आढळत नाही. रिट याचिका तथ्यहीन असल्याने फेटाळण्यात येत आहेत, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. याचवेळी याचिकाकर्त्या संस्थांतर्फे सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्याची तयारी दर्शवून उच्च न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी तातडीने न करण्याची विनंती करण्यात आली.

## खामेनेई यांच्या अंत्यसंस्काराला मेहबूबा मुफ्ती उपस्थित राहणार

■ तेहरान

**पीडीपीच्या** प्रमुख मेहबूबा मुफ्ती या ३ ते ६ जुलैदरम्यान तेहरान येथे होणाऱ्या इराणचे माजी सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनेई यांच्या



राजकीय शासकीय अंत्यसंस्कार सोहळ्यात सहभागी होणार आहेत. इराणने त्यांना भारताच्या विशेष पाहुण्या म्हणून अधिकृत निमंत्रण दिले आहे.

मेहबूबा मुफ्ती म्हणाल्या, हा माझ्यासाठी अत्यंत मोठा सन्मान आहे. खामेनेई यांना अखेरची श्रद्धांजली वाहण्यासाठी मी तेहरानला जाणार आहे. इराणने भाजपा, काँग्रेस आणि पीडीपीच्या नेत्यांबरोबरच जैन संत आचार्य लोकेश मुनी यांनाही निमंत्रण पाठवले आहे. भारत सरकारतर्फे परराष्ट्र राज्यमंत्री पबित्र मार्गेरिटा आणि बिहारचे राज्यपाल सय्यद अता हसनैन हेही अंत्यसंस्काराला उपस्थित राहणार आहेत. इराणच्या अंदाजानुसार, खामेनेई यांच्या अंत्ययात्रेत १.५ ते २ कोटी नागरिक सहभागी होऊ शकतात.

## आणखी एक आमदार शिंदेंसोबत अपक्ष आ.किरण सरनाईकांचा पाठिंबा

■ मुंबई

**उबाठाचे** सहा खासदार व आमदार सचिन अहिर यांच्या पाठोपाठ आता अमरावती शिक्षक मतदारसंघाचे अपक्ष आमदार किरण सरनाईक यांनीही शिवसेनेला जाहीर पाठिंबा दिला आहे. सरनाईक हे पूर्वी युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते. शिक्षक मतदारसंघाची निवडणूक त्यांनी अपक्ष लढवली होती. आता ते शिवसेनेचे 'सहयोगी सदस्य' म्हणून काम करणार आहेत.

यावेळी बोलताना सरनाईक म्हणाले की, महायुती सरकार ज्या वेगाने आणि धडाडीने काम करत आहे, त्या कामाने प्रभावित होऊन मी शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. सरनाईक यांच्या निर्णयाचे स्वागत करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्यात शिवसेनेचे काम पाहून किरण सरनाईक यांनी सहयोगी सदस्य होण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## राज्यभरात पावसाची संततधार सुरूच झाडे कोसळली! वाहतूक विस्कळीत

■ मुंबई

**राज्यात** गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, नागपूर, कोल्हापूर, बीड, बुलडाणा आणि मराठवाड्यातील अनेक भागांना पावसाचा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी पाणी साचणे, झाडे कोसळणे, वाहतूक कोंडी, वीजपुरवठा खंडित होणे आणि



चर्चगेट स्टेशनजवळ एक झाड उन्मळून पडल्याने गाड्यांचे नुकसान झाले. (छाया-दीपक साळवी)

दरड कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. मुंबईत समुद्रात १५ फूट उंचीच्या लाटांची शक्यता हवामान खात्याने वर्तवल्याने मुंबई पालिकेने समुद्रकिनाऱ्यापासून » पान ७ वर

## एकरी १.६० कोटी भरपाई द्या वाळूज प्रकल्पग्रस्तांची मागणी

■ छत्रपती संभाजीनगर

**वाळूज** औद्योगिक परिसरातील प्रस्तावित आरापूर एमआयडीसी प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी शासनाने देऊ केलेली रक्कम नाकारली असून, एकरी १ कोटी ६० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी विनय गौडा आणि आरापूर, सुलतानाबाद आणि गवाली शिवार येथील प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची बैठक नुकतीच संपन्न झाली. बैठकीत शेतकऱ्यांनी आपल्या समस्या जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. जिल्हाधिकारी गौडा यांनी तक्रारी ऐकून घेतल्या आणि त्या राज्य सरकारसमोर मांडण्याचे आश्वासन दिले. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी प्रति एकर कमाल नुकसान भरपाई २४ लाख रुपये निश्चित केली आहे. तसेच बाधितांना एमआयडीसीकडून काही प्रमाणात विकसित जमीन देण्यात येणार आहे, अशी माहिती गौडा यांनी बैठकीत दिली. मात्र प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी एकमुखाने सरकारची ही नुकसान भरपाईची रक्कम नाकारली आणि एकरी १ कोटी ६० लाख रुपये नुकसान भरपाईची मागणी केली. त्यामुळे बैठकीत सहमती होऊ शकली नाही.

## शेतीकामासाठी गौणखनिज रॉयल्टी मुक्त! ट्रॅक्टरवर कारवाई होणार नाही

■ मुंबई

**शेतीसंबंधित** कामांसाठी आवश्यक असलेले गौणखनिज (मुरूम, वाळू, दगड आदी) रॉयल्टीमुक्त उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत याबाबत निवेदन सादर करत शेतकऱ्यांना दिलासा देणारी घोषणा केली.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, शेतीसाठी आवश्यक असलेले गौणखनिज शेतकऱ्यांना रॉयल्टीमुक्त उपलब्ध करून दिले जाणार आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांना मंडळ अधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल. अर्ज मंजूर झाल्यानंतर शेतकऱ्यांना १५ दिवसांची अधिकृत परवानगी दिली जाईल. या कालावधीत शेतातील रस्त्यांची दुरुस्ती तसेच इतर शेतीसंबंधित कामांसाठी गौणखनिजाचा वापर करता येणार आहे. या कामांसाठी आणि

**मंत्री बावनकुळेंची घोषणा**



गौणखनिजाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालकीच्या ट्रॅक्टरवर कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई केली जाणार नाही.

ही सवलत केवळ शेतीच्या आवश्यक कामांसाठीच लागू राहणार असून, गौणखनिजाचा व्यावसायिक वापर करण्यास सक्त मनाई असेल. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात बचत होण्यास मदत होणार असून, शेतीसाठी आवश्यक पायाभूत कामे अधिक सुलभपणे करता येणार आहेत.

## महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक विधानसभेत मंजूर

■ मुंबई

**महाराष्ट्र** महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ राज्य विधानसभेत आवाजी मतदानाद्वारे एकमताने मंजूर करण्यात आले. हे विधेयक मंजूर झाल्यामुळे आता राज्यातील महिला शेतकऱ्यांना कागदोपत्री शेतकरी महिला अशी ओळख मिळणार आहे. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी हे विधेयक मांडले.

हे विधेयक सादर करताना दत्तात्रय भरणे म्हणाले की, शेतात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या, मात्र जमिनीवर नाव नसल्याने 'शेतमजूर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महिलांना आता कायदेशीर ओळख मिळणार आहे. हरितक्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त (कृषी दिन) हे विधेयक सादर करण्यात आले असून, महिला शेतकऱ्यांसाठी असा स्वतंत्र कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या विधेयकांतर्गत शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर महिलांचे नाव समाविष्ट करण्यासाठी राज्यभर विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. तसेच कृषी विभागाच्या सर्व योजनांमध्ये महिला शेतकऱ्यांसाठी किमान ३० टक्के आरक्षण देण्यात येईल.

## डे-केअरमध्ये धक्कादायक प्रकार मुलाला वॉशिंग मशीनमध्ये बसवले

■ बंगळूरु

**बंगळुरूमधील** आयटी कंपनी कॅपजेमिनीच्या एचएएल कॅम्पसमध्ये सुरू असलेल्या डे-केअर सेंटरमध्ये दोन-तीन वर्षांच्या मुलासोबत गैरवर्तन केल्याचा संतापजनक प्रकार उघड झाला आहे. सेंटरच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओत एका मुलाला वॉशिंग मशीनच्या ड्रममध्ये बसवून ठेवल्याचे दिसत आहे.

सेंटरचे काही व्हिडिओ व्हायरल झाले असून, येथील महिला कर्मचारी एका मुलासोबत गैरवर्तन करताना दिसत आहेत. एका व्हिडिओमध्ये मुलाला शौचालयात बंद करण्यात



आल्याचे, जमिनीवर झोपल्याचे व मोठ्याने रडत असल्याचे दिसते. आणखी एका व्हिडिओमध्ये महिला मुलाला टॉयलेट सीटवर बसवून त्याच्या तोंडावर जेट स्प्रेने पाणी मारत आहे. एका व्हिडिओत मुलाला फ्रंट लोड वॉशिंग मशीनच्या ड्रममध्ये बसवून ठेवले आहे. त्याला घाबरवले जात आहे, मुलगा रडत आहे. डे-केअरचे व्हिडिओ २९ जून रोजी व्हायरल झाल्याचे सांगण्यात आले. पोलिसांनी ५ महिला कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मात्र, किती मुलांसोबत असे गैरवर्तन झाले याची माहिती समोर आलेली नाही. पोलीस उपायुक्त सैदुलु अडावथ यांनी सांगितले की, डे-केअरमध्ये येणारी मुले कॅम्पसमध्ये काम करणाऱ्यांची आहेत.

## विजेचा खेळखंडोबा! गावदेवी ग्रँट रोडमधील रहिवासी त्रस्त

■ मुंबई

**दक्षिण** मुंबईतील गावदेवी व ग्रँट रोड (पश्चिम) परिसरात पुन्हा एकदा वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. गेल्या महिनाभरात या परिसरातील ही चौथी वीजखंडित होण्याची घटना असल्याचे स्थानिकांनी सांगितले. वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. मुंबईत राहूनही गावात असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे, अशी प्रतिक्रिया एका नागरिकाने व्यक्त केली. सततच्या वीजखंडित घटनांमुळे घरगुती कामकाज, व्यावसायिक व्यवहार तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असल्याची तक्रार स्थानिकांनी केली. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित यंत्रणेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## खरात प्रकरणी नाहक बदनामी! रुपाली चाकणकर यांची दिल्ली हायकोर्टात धाव

■ पुणे

**भोंदू** अशोक खरात प्रकरणी आपली नाहक बदनामी झाल्याचा दावा करत राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) नेत्या रुपाली चाकणकर यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. खरात प्रकरणात एआयचा वापर करून बनावट व्हिडिओ व कसलाही पुरावा नसताना आपली बदनामी करणाऱ्या काही महिलांविरोधात त्यांनी न्यायालयात फौजदारी मानहानीची तक्रार दाखल केली आहे.



चाकणकर यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत दिल्ली उच्च न्यायालयाने राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्या आशा मिरगे, अजित पवार राष्ट्रवादी पक्षाच्या नेत्या रुपाली ठोंबरे, उबाठाच्या उपनेत्या सुषमा अंधारे, समाजसेविका अंजली दमानिया, तसेच युट्युब व्हिडिओ, काही पत्रकारांना अधिकृत नोटिसा बजावल्या आहेत. चाकणकर यांनी म्हटले आहे की, खरात प्रकरणाच्या पहिल्या दिवसापासून माझी भूमिका स्पष्ट होती. माझा त्याच्या कोणत्याही आर्थिक किंवा जमीन व्यवहारांशी संबंध नाही. विनापुरावे चारित्र्यहनन करणाऱ्या प्रवृत्तींविरोधात ही माझी कायदेशीर लढाई आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० जुलै रोजी असून, नोटीसा बजावलेल्यांना कोर्टात हजर राहावे लागणार असून, मीही कोर्टात जाणार आहे.

## पाऊस आणि अपघाताचा फटका पश्चिम रेल्वेच्या प्रवाशांचे हाल

■ विरार

**वैतरणा** आणि विरार स्थानकांच्या दरम्यान गुरुवारी सकाळी झालेल्या अपघात तसेच पावसामुळे पश्चिम रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले होते. वसई-विरारवरून मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांचे त्यामुळे मोठे हाल झाले.

गुरुवारी सकाळी ९.३० च्या सुमारास वलसाड-मुंबई सुपरफास्ट पॅसेंजर विरारच्या दिशेने येत असताना नारंगी फाटकाजवळ एका महिलेचा अपघाती मृत्यू झाला. या अपघातामुळे वलसाड एक्स्प्रेस बराच वेळ जागेवरच थांबून होती. याचा थेट फटका मुंबईच्या दिशेने येणाऱ्या इतर लांब पल्ल्याच्या गाड्यांना आणि चर्चगेटच्या दिशेने जाणाऱ्या लोकल ट्रेनला बसला. ऐन गर्दीच्या वेळी गाड्यांचा खोळंबा झाल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल झाले.

दरम्यान, गुरूवारी पडणाऱ्या पावसाचा थेट परिणाम लोकल सेवेवर झाला. सकाळी पश्चिम रेल्वे मार्गावर विरार ते चर्चगेट दरम्यान १० ते २० मिनिटे उशिराने लोकल धावत होत्या. त्यामुळे विरार, वसई आणि नालासोपारा स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. मेमू सेवेलाही पावसाचा फटका बसला. मेमू गाडी तब्बल अर्धा तास उशिराने वसईत दाखल झाल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली होती.

## उद्घाटनानंतर तीन महिन्यांतच दिल्ली-डेहराडून महामार्गावर खड्डे

**सुमारे १२,००० कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या दिल्ली-डेहराडून द्रुतगती मार्गाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. उद्घाटनानंतर अवघ्या तीन महिन्यांतच या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत.**



■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी १४ एप्रिल रोजी या सहा पदरी द्रुतगती मार्गाचे उद्घाटन केले होते. या प्रकल्पामुळे दिल्ली ते डेहराडून दरम्यानचा प्रवास वेळ पाच ते सहा तासांवरून सुमारे २ ते २.५ तासांपर्यंत कमी होणार असल्याचे सांगण्यात आले होते.

दरम्यान, एका व्यक्तीने एक्सवर या द्रुतगती मार्गावरील खड्ड्यांचा व्हिडिओ शेअर करत नरेंद्र मोदी यांना टॅग केले. त्याने म्हटले की, या खड्ड्यांमुळे माझ्या डोळ्यासमोर पाच ते सहा अपघात झाले आहेत. अजून पहिलाच पावसाळा पूर्ण झालेला नाही, तरीही रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. हा दिल्ली-डेहराडून द्रुतगती मार्ग आहे, ज्याचे उद्घाटन तुम्ही काही महिन्यांपूर्वीच केले होते. हा रस्ता बांधण्यासाठी जवळपास पाच वर्षे लागली, तरीही तो पहिल्याच पावसात खराब झाला आहे. ही त्याची केविलवाणी अवस्था आहे.

## शरद पवार सांगतील तेच धोरण खा. अमोल कोल्हे यांचा खुलासा

■ मुंबई

**पुणे-नाशिक** रेल्वे प्रकल्पाच्या संदर्भातील वक्तव्यावरून राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या जोरदार चर्चांवर अखेर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी पडदा टाकला आहे. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी आपल्या कालच्या 'ऑफर आली तर भविष्यात विचार करेन', या विधानाचा चुकीचा अर्थ काढला गेल्याचे सांगत संपूर्ण प्रसंग स्पष्ट केला. शरद पवारसाहेब सांगतील तेच आमचे धोरण आहे, असे सांगत त्यांनी आपण पक्षातच राहणार असल्याचा खुलासा केला. अमोल कोल्हे म्हणाले की, काल मी पत्रकारांशी बोलत असताना एका पत्रकाराने मला विचारले की, राजाभाऊ वाजे व अमोल कोल्हे भाजपामध्ये गेल्याशिवाय पुणे नाशिक रेल्वे होणार नाही का? पुणे-नाशिक रेल्वे संदर्भात सातत्याने मागणी आहे की, मूळ आरेखनानुसारच (अलाईनमेंट) पुणे-नाशिक रेल्वे व्हावी. तुम्ही भाजपामध्ये गेल्याशिवाय ही रेल्वे होणार नाही का? असा प्रश्न एका पत्रकाराने विचारला. यावर माझा त्यांना प्रतिप्रश्न होता की, अशी काही ऑफर आहे का? जर तशी काही ऑफर रेल्वेच्या संदर्भात आली तर विचार करू.